संस्थापक के. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



सप्टें ०६

किसी के साथ रहो तो वफादार बन के रहो
धोखा देना गिरे हुए लोगों की पहचान होती है ।

मा.श्री. राजुमामा जाधव

अध्यक्ष : सिध्देश्वर तरुण मंडळ,जंगुभाई तालिम (ट्रस्ट)

आपणांस उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा

शुभेच्छुक :- ज्ञानेश्वर (ननु) दौंडकर । दिगंबर दौंडकर । अमोल शिंदे । अतुल शिंदे
अमित आनेचा । सचिन (दादा) उदगिरकर । मनोज कोडम । मंदार अलचेट्टी । बालुमामा मुंगसे

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, गुरुवार दि. ०५.०९.२०२४ | अंक नं. १५९ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

'ऑनलाईन' पद्धत आल्यानंतरही रेशनच्या धान्यवाटपात 'भ्रष्टाचार'

धान्याचे वाटप केले जात नसल्याच्या तक्रारी, चौकशीची मागणी

नगर – स्वस्त धान्य दुकानातून रेशन कार्डधारक नागरिकांना यापूर्वी ऑफलाईन पद्धतीने धान्य वितरण केले जात होते. त्यावेळी धान्य वाटपात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत होता. या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी शासनाने धान्य वाटपासाठी ऑनलाईन म्हणजेच संगणकीय प्रणाली आणली. परंतु ऑनलाईन पद्धतीच्या धान्य वाटपातही मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला जात असून, तांत्रिक कारणे पुढे करून अनेक नागरिकांना स्वस्त धान्यापासून वंचित ठेवले जात आहे. सर्व्हर डाऊनच्या नावाखाली रेशनधारकांचे पॉझ मशीनवर थम्ब घेतले जातात, परंतु त्यांना चालू महिन्याचे धान्य वाटप न करता पुढील महिन्यात धान्य वाटप करण्याचे प्रकार घडत आहेत. काही ठिकाणी तर एकपेक्षा अधिक महिन्यांचे धान्य वाटपच केले जात नसून ही गंभीर बाब असून, तहसीलदारांसह पुरवठा विभागाने या बाबीची सखोल चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.

केडगाव उपनगरातील एका स्वस्त धान्य दुकानदाराने ३० ऑगस्टपर्यंत रेशनकार्ड धारकांना धान्य वाटप केले नाही. दुकानदाराने महिन्याचा नियमित धान्याचा कोटा उचलला, परंतु नागरिकांना त्याचे वाटप केले नाही. त्यामुळे सुभाष भिमराव गेनाप्पा यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. धान्य वाटपाबाबत संबंधित दुकानदारास विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. संबंधित दुकानदाराने मागील महिन्यात सर्व्हर डाऊन असल्याचे कारण देत अर्धेच धान्य वाटप केले. संबंधित दुकानदार ऑनलाईन पद्धतीने धान्य वितरणात भ्रष्टाचार करत आहे. तरी यासंदर्भात संबंधित दुकानदारावर कारवाई करावी अन्यथा दुकानदारावर दरोड्याचा दावा करून न्यायालयाकडे दाद मागू, असा इशारा श्री. गेनाप्पा यांनी दिला आहे. शासन अनेक योजना राबवत आहे. लाडकी बहिण, मोफत गॅस, मोफत धान्य अशा योजनांमुळे नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळत आहे, परंतु भ्रष्टाचारी लोक गोरगरीबांच्या वाट्याचा धान्याचा कोटाची कोटा गायब करून त्यांना लाभापासून वंचित ठेवत आहेत. रेशन वाटपातील गोंधळ, भ्रष्टाचार याचे योग्य पद्धतीने ऑडिट होणे गरजेचे असल्याचे म्हटले आहे.

सिंगापुर मलेशिया थायलंड 1,61,000/- १० दिवस	वाराणसी अयोध्या लखनौ 57,000/- ८ दिवस	बेस्ट ऑफ अंदमान 73,000/- ७ दिवस	
हनिमून शिमला मनाली 35,000/- ६ दिवस	जैनिताल मसुरी कॉर्बेट 41,000/- ६ दिवस	दुबई अबुधाबी 1,05,000/- ७ दिवस	
राजस्थान मेवाड 47,000/- ९ दिवस	सिक्कीम दार्जिलिंग 72,000/- ९ दिवस	हायलाईट्स् ऑफ केरळ 36,000/- ६ दिवस	
काश्मिर हायलाईट्स् 55,000/- ७ दिवस	बँकॉक पटाया फुकेत 1,16,000/- ८ दिवस	बेस्ट ऑफ नेपाळ 73,000/- ८ दिवस	

सीमा कार्ड ट्रॅव्हेल सेल्स पार्टनर

राजलक्ष्मी हॉलिडेज्

प्रसाद श्रीकांत मांढरे
98500 63432
लालटाकी रोड, कालिका प्राईड, २ रा मजला, ऑफिस नं. २०६, अहमदनगर.



COURSE HIGHLIGHTS
Complete 3D Animation career program
Industry visits & workshops
Making a portfolio after every Module
E-Projects
C Programming
C++ Programming
Data Structure, PHP
Python, Java
.Net

CERTIFICATE COURSE IN
SOFTWARE PROGRAMMING
An ISO 9001:2015 Certified
DISHA COMPUTER INSTITUTE

Duration : 6 Months

Delhi Gate Branch
1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001
9371051769

Old ST stand Branch
1st Floor, Ambar Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, A.nagar
9371151769

Pipeline Branch
Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003
7447761769

EARTH's Green Library
Greenery for Every Space

Get a Plant Today!
- Potted Planters
- Premium Planters
- Garden Accessories
- Garden Furniture
- Garden Lightings

Fresh Environment with Indoor Plants

Amit Sanklecha 99231 43334
Website : greenlibrary.in

Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

सेल... सेल... सेल... सेल... सेल... सेल...

सेजल
महासेल महामेळावा
इस से सस्ता कही नहीं...

स्पेशल किंमत सेल | स्पेशल किंमत सेल

शालु । फॅन्सी डिझायनर साडी
कॉटन सिल्क साडी । कॅटलॉग साडी
प्युअर येवला पैठणी

महिलांसाठी रोजगार योजना
घर बसल्या साड्यांचा व्यवसाय करून
कमवा ५ ते ५० हजार महिना तेही मिल रेटमध्ये

मिल टु ग्राहक
SNB MILL
कॅन्सी साडी । कुर्ती । टॉप । लेगिंग्ज
8182818220
नगर अर्बन बँक रोड, बोरा ज्वेलर शेजारी, कापड बाजार, अहमदनगर – ४१४ ००१

द्वितीय पुण्यस्मरण

स्व. श्री. विजयकुमारजी कुंदनमलजी चोरबेले (कडावाला)
(स्वर्गवास दि. ०५-०९-२०२२)

सर्वोच्च मूल्यों की विरासत जो आपने हमें दी है,
प्रगती की ओर बढने की प्रेरणा
जो हमने आपसे ग्रहण की है,
ऐसे उन्मुख व्यक्तित्व का
हम सदैव स्मरण करेंगे,
आपके सिखाये आदर्शो पर
समर्पित भाव से चलेंगे।

भावपूर्ण श्रध्दांजली

बेटा – अभिजीत अर्णव चोरबेले, **बहू** – अंजली अभिजीत चोरबेले
बेटी / जमाई – अविना प्रितेशजी कटारिया, **भाई** – अजीत पुष्कर चोरबेले
एवं चोरबेले (जैन) परिवार (कड़ावाला), पूना.

ससुराल पक्ष – डागा परिवार, पूना/अहमदनगर, दिनेश मुनोत परिवार, औरंगाबाद
अरुणजी रोहन बोरा परिवार, कासारवाडी, पूना.

मैं अपने लिए नहीं, अपनों के लिए हूं !

बदलत्या दृष्टिकोनास उदंड प्रतिसाद अहिल्यानगरकरांना जाहीर धन्यवाद...

राष्ट्रभक्तीच्या विचारांसह शहराच्या एकूणच विकासाकरीता निर्णायक बदलत्या आणि प्रचंड, उदंड प्रतिसादाबद्दल सर्व श्रोते, सुज्ञ नगरवासियांना **त्रिवार – जाहीर – धन्यवाद – आभार**

आपणा सगळ्यांच्या प्रतिसादाच्या पाठबळावर हा वैचारिक ज्ञानयज्ञ चालू ठेवून शहराच्या सर्वांगिण उत्कर्षाचा सर्व मिळूनी प्रयत्न करू या.

पुनश्च एकवार आपणा सर्वांचे मनापासून आभार व धन्यवाद.

* सदैव कृपाभिलाषी *
विकास पाथरकर । सुधीर पगारीया ।
मिलिंद गंधे । धनंजय तागडे

पं. दीनदयाळ परिवार प्रतिष्ठाण
पं.दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था
सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते,
सहयोगी स्नेही परिवार

Dishan

श्री. वसंत लोढा
संयोजक दीनदयाळ व्याख्यानमाला

शिक्षक दिन, पर्युषणपर्व व गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा...!

Sintex
PVC DOORS

Ideal for Bathroom Toilet & Kitchen
BHINGARWALA ENTERPRISES
Near Swastik Chowk, Station Road. Ahmednagar. Mob 9422224990

शाळेमध्ये
CCTV लावणे मजबुरी नाही
तर गरज आहे

ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay
98222 94622
94220 87757
Swami Vivekanand Chowk, Gujar Galli, Ahmednagar

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाळोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य सुंदेचा

email - navamaratha@gmail.com

प्रश्न उद्याचे... उतरांचा शोध आजपासून...

एकवीसावं शतक तंत्रज्ञानाचं आहे असं नेहमी सांगण्यात, ऐकण्यात येतं. आजच्या तरुण पिढीनं केलेल्या कामांमुळे आज भारत तंत्रज्ञानाच्या वापरात पुरेसा आघाडीवर आहे. तरीपण तंत्रज्ञान निर्मिती, नियमन, भविष्यात येऊ पाहणाऱ्या तंत्रमंत्रांचा अंदाज घेण्यात आपला देश आघाडीवर आहे असे म्हणणे धाडसाचं ठरेल.

वाढते महागैरकण, मुलभूत सेवासुविधांची कमतरता, प्रदूषण, लोकसंख्या, नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास, पाणी, अन्नधान्य इतकेच काय सामाजिक, कौटुंबिक, नैतिकतेचा ऱ्हास या प्रश्नांची जे उग्रा रौद्र व भयानक होऊ शकतात त्याची उत्तरे व सोडवणूकची तयारी आजपासूनच करावी लागेल.

ऑस्ट्रेलियात 'स्टीप' (सोशल टेक्नॉलॉजीकल, इकॉनॉमिक, एन्व्हायर्नमेंट, पॉलिटीकल-STEEP) या संज्ञेचा वापर केला जातो. या स्टीप बेजातले कल, आमूलाग्र बदल, अनिश्चितता यांची चाहूल घेणं, राहणं यामागेच प्रयोजन. एखादं धोरण बनवण्यापूर्वी 'स्टीप' क्षेत्रात भविष्यात काय घडू शकतं याची तपासणी करून त्याप्रमाणे धोरण आखणी करायची असं हे ढोबळ स्वरूप.

खरे तर राज्यकर्त्यांनी व प्रशासनाच्या अंमलकर्त्यांनी याप्रमाणे भविष्यकालीन प्रश्नांची चर्चा समाजासमोर करणे गरजेचे. प्रसार माध्यमांनी निदान काही वेळ या प्रश्नांना दिला तरच समाज टिकेल.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन

"मुसाफिर"-९८२२०२०६९१



राज्य शासनाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन, युनिफाईड निवृत्ती व सुधारित निवृत्तीवेतन योजनेतून एक पर्याय निवडता येणार : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

अधिकारी-कर्मचारी संघटनांच्या बैठकीत निर्णय

मुंबई - राज्यातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या नव्याने जाहीर झालेल्या युनिफाईड निवृत्तीवेतन योजना, राष्ट्रीय पेन्शन योजना आणि राज्य शासनाने अर्धसंकल्पीय अधिवेशनात जाहीर केलेल्या सुधारित निवृत्ती योजनेपैकी एका पर्यायाची निवड करण्याची संधी देण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री यांच्या या निर्णयावर विविध अधिकारी आणि कर्मचारी संघटनांनी सहमती दर्शवत संप संस्थगित करण्याची घोषणा केली.

राज्य शासनाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव आय. एस. चहल, मुख्यमंत्र्याचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे सल्लागार ग.दी. कुलथे, अध्यक्ष विनोद देसाई, अखिल भारतीय राज्य सरकारी महासंघाचे उपाध्यक्ष विश्वास काटकर यांच्यासह इतर अधिकारी, कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अधिकारी-कर्मचारी संघटनांच्या बैठकीत बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे.

मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले, की आपण सर्व अधिकारी-कर्मचारी शासनाचा गाभा आहात. सर्वांना न्याय मिळावा, शाश्वत निवृत्ती वेतन मिळावे, ही आमची भावना आहे. शासन शब्दाला पक्के आहे. शासन शब्दाला पक्के असून अधिकारी आणि कर्मचारी यांचे नुकसान होऊ देणार नाही. संघटनांची मागणी लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या एनपीएस, युनिफाईड निवृत्ती वेतन योजना आणि राज्य शासनाने जाहिर केलेली सुधारित निवृत्ती वेतन योजना निवडण्याची संधी त्यामुळे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना या योजनांचा अभ्यास करुन त्यांच्या दृष्टीने फायद्याची योजनेची निवड करता येणार आहे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी जाहीर केले.तसेच १ नोव्हेंबर २००५ पूर्वी जाहिरात निघालेल्या जिल्हा परिषदेतील अधिकारी- कर्मचारी यांना जुनी पेन्शन लागू करण्यासाठीचा प्रस्ताव लवकरात लवकर मंत्रिमंडळासमोर आणण्यात यावा. यापूर्वी विविध अधिकारी आणि कर्मचारी संघटनांसोबत झालेल्या बैठकीत केलेल्या घोषणा आणि मान्य केलेल्या मागण्यांच्या पुर्ततेचा आढावा घेण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी संबंधित विभागांना दिल्या. राज्यातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी सुधारित निवृत्तीवेतन योजनेबाबत मागणी मान्य केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. त्याचप्रमाणे घोषित केलेला संप संस्थगित करत असल्याचे या प्रतिनिधींनी जाहीर केले.

मयत व्यक्तीच्या वारसांची माहिती देण्याचे पोलिसांनी केले आवाहन

नगर - नगर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार घेत असताना ३० ऑगस्ट रोजी मयत झालेले गोपाल गोरु खुडे (वय ७२) यांच्या वारसांचा शोध लागलेला नाही तसेच त्यांचा पत्ताही समजलेला नाही. तरी या मयत व्यक्तीच्या वारसांबाबत कोणाला काही माहिती असल्यास ती देण्याचे आवाहन नगरच्या तोफखाना पोलिसांनी केले आहे.

मयत खुडे हे २० ऑगस्ट रोजी जिल्हा रुग्णालयाच्या परिसरात आजारी अवस्थेत आढळून आले होते. त्यांच्यावर उपचार सुरु असताना ३० ऑगस्ट रोजी ते मयत झालेले आहेत. याबाबत तोफखाना पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आलेली आहे. या मयताच्या वारसांनी किंवा त्यांच्याबद्दल माहिती आलेल्यांनी तोफखाना पोलिस ठाणे (फोन - ०२४१- २४१६१७८) अथवा पो. ना. व्ही. सी. गंगावणे (मो. ९५५२५२१५८४) यावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मारुतीराव आगरकर यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर - येथील मारुतीराव सितारामं आगरकर (वय ७१) यांचे अल्पश: आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, एक मुलगा, दोन मुली, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

आगरकर फुलांचे व्यापारी दिलीप आगरकर यांचे धोरले बंधू, निलेश आगरकर यांचे वडील, स्वप्निल आगरकर यांचे चुलते होत.

सेवानिवृत्त आर.टी.ओ. अधिकारी

सय्यद शाह निजाम यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - येथील मुकुंदनगरमधील रहिवासी सेवानिवृत्त आर.टी.ओ. अधिकारी सय्यद शाह निजाम नन्हेमियाँ उर्फ शाह (आरटीओ, वय ७०) यांचे ४ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने पुणे येथे निधन झाले.

चिचोंडी पाटील (ता. नगर) येथील कब्रस्तानमध्ये त्यांचा दफनविधी करण्यात आला. त्यांच्या पश्चात भाऊ, भाऊजय, पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

शेख कलीम यांचे हृदयविकाराने निधन

नगर - येथील मुकुंदनगरमधील रहिवासी शेख कलीम (मुन्ना) नूरमोहंमद (वय ५२) यांचे ४ सप्टेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांचा दफनविधी नगर कॉलेज मागील हसनशाह कादरी कब्रस्तान येथे करण्यात आला.

त्यांच्या मागे पत्नी, ३ मुले, १ मुलगी असा परिवार आहे.

नरेश बैद यांचे अल्प आजाराने निधन

नगर - येथील मुकुंदनगरमधील रहिवासी नरेश अशोक बैद (वय ४९) यांचे ४ सप्टेंबर रोजी अल्पश आजाराने निधन झाले. त्यांच्यावर मिंगार येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

अशोक चमन बैद यांचे ते चिरंजीव होत. त्यांच्यामागे आई, वडील, पत्नी, ४ मुली, १ भाऊ, भाऊजय, २ बहिणी, मेहुणे असा परिवार आहे.

नंदकिशोर परदेशी यांचे अपघाती निधन

नगर - येथील डावरे गल्लीत राहणारे नंदकिशोर उर्फ नंदुभैय्या परदेशी (वय ६७) यांचे ४ सप्टेंबर रोजी अपघाती निधन झाले. कोठला स्टॅण्ड रोडवर अज्ञात वाहनाने सकाळी ७.३० वाजता त्यांना धडक दिली.

त्यांच्यावर शुक्रवारी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्यामागे एक मुलगा, एक मुलगी, नातू असा परिवार आहे. गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर इंजि.रोहित परदेशी यांचे ते वडिल होत.

उज्वलाबाई सरनोत यांचे आकस्मिक निधन

नगर - दौंड येथील उज्वलाबाई प्रेमसुखलाल सरनोत (वय ७४) यांचे ३ सप्टेंबर रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर ४ सप्टेंबरला दौंड येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नगर येथील 'एच बन्सीलाल भुथा सराफ'चे कमलेश, कपिल मुथा यांच्या त्या आत्या होत.

अलकाबाई दांगट यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर - सर्जेपूरा येथील अलका मच्छिंद्र दांगट (वय ४५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. महिलांच्या सर्वांगीन विकासासाठी त्या कार्यरत होत्या. मच्छिंद्र दांगट यांच्या त्या पत्नी होत्या.

त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, जावई, नातवंड असा परिवार आहे.

महामार्गालगत ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग

भिंगार शहरातील विजयनगर चौकाच्या जवळपास काही अंतरावर महामार्गलगत ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग दिसून येत आहे. दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले. कचऱ्यामुळे घाणीचे साम्राज्य पसरल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. गेल्या कित्येक दिवसापासून हे कचऱ्यीची डिगारे जसेच्या तसे पडून असल्यामुळे या डिगाऱ्यावर मोकाट जनावरे, कुत्रे फिरत राहतात. त्यात पावसाचे पाणी, जनावरांचे मल-मूत्र या डिगाऱ्यावर पडल्याने त्याची दुर्गंधी सुटते. सदरील डिगाऱ्यावर फिरणारी जनावरे तेथेच रस्त्यावर ठाण मांडतात.

मंगळवार बाजारातील कचरा संकलन करण्यास महानगरपालिकेस विलंब होत असल्याने नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. (छाया - लोकेश बर्वे)

शहरातील नागरिकांनी रस्त्यावर, मोकळ्या जागेत कचरा टाकू नये

अहमदनगर महानगरपालिकेकडून घंटागाडीसाठी संपर्क क्रमांक ९११७१७३५३५ जाहीर: आयुक्त यशवंत डांगे यांची माहिती

नगर - आपले शहर स्वच्छ रहावे, त्यातून नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे, यासाठी महानगरपालिकेमार्फत स्वच्छतेविषयी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. दरशेन एकेका प्रमुख रस्त्यावर अभियान राबवून साफसफाई केली जात आहे. अनेक सामाजिक संस्था या अभियानात सहभागी होत आहेत. नागरिकांनीही रस्त्यावर अथवा मोकळ्या जागेत कचरा न टाकता या अभियानाचा एक भाग व्हावे, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

नागरिकांनी, व्यावसायिक आस्थापनांनी केवळ घंटागाडी मध्येच कचरा टाकावा. घंटागाडी न आल्यास ९१७१७१७३५३५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

महानगरपालिका सफाई आपनाओ, बिमारी भगाओ अभियान राबवून साफसफाई करत आहे. रस्त्यावरील कचरा, प्लास्टिक, हरित कचरा उचलून साफसफाई केली जात आहे. स्वतः आयुक्त यशवंत डांगे दररोज स्वच्छता अभियानात सक्रीय सहभाग घेत आहेत.

घनकचरा व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी, सफाई कामगार स्वच्छतेसाठी प्रयत्न करत आहेत. मात्र, अनेक ठिकाणी नागरिक, व्यावसायिक, दुकानदार रस्त्यावर कचरा टाकत आहेत. त्यांनी घंटागाडीतच कचरा टाकावा.

गाडी न आल्यास संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन घनकचरा व्यवस्थापन विभागाने केले आहे.

भटके विमुक्त आदिवासी समाजाची जनगणना करावी, स्वतंत्र मंत्रालय व बजेटमध्ये स्वतंत्र आर्थिक तरतूद करा

गायरान, गावठाण, वनजमिन व इतर निवासी अतिक्रमणांचे नियमितिकरन करण्यात यावे; मागण्यांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

नगर - भटके विमुक्त आदिवासी समाजाची जनगणना करावी, स्वतंत्र मंत्रालय व बजेट-मध्ये स्वतंत्र आर्थिक तरतूद करावी गायरान, गावठाण, वनजमिन व इतर निवासी अतिक्रमणांचे नियमितिकरन करण्यात यावे यांसह इतर माण्ण्यांसाठी भटके विमुक्त आदिवासी, संयोजन समितीच्या वतीने डॉ. अरुण जाधव यांनी निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांना निवेदन दिले.

भटके, विमुक्त, आदिवासी संयोजन समितीचे सदस्य महेंद्र रोकडे, मुमताज शेख, आप्पाराव राठोड, उमाताई जाधव, शैला यादव, बाबुसिंग पवार, भावना वाघमारे व भटके विमुक्त आदिवासी समाजातील पारंपरिक लोक कलावंत वासुदेव, गोंधळी, नंदिवाला, मदारी, गोसावी, रायरंद, बहुरूपी, नाथपंथी डवरी गोसावी, कोल्हाटी, चिल्ह, पारधी, म्हसनजोगी, नंदीवाले, जोशी, ठोंबारी, काशी कापडी अशा भटके विमुक्त समाजातील ४२ जातींचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

२८ ऑगस्टपासून फुले वाडा, पुणे येथून निघालेली ही संवाद यात्रा सोलापूर, सांगली, सातारा मार्गे अहमदनगर येथे ४ सप्टेंबर रोजी पोहोचली. ही संवाद यात्रा नाशिक, छत्रपती संभाजीनगर, परभणी, नांदेड, यवतमाळ, वाशिम, अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर, ठाणे मार्गे २३ सप्टेंबर रोजी मुंबईत मंत्रालयावर जाणार आहे. तेथे संबंधित खात्याचे मंत्र्यांसोबत भटके विमुक्त व आदिवासी समाजाच्या माण्ण्यांबाबत चर्चा व विचार विनिमय होणार आहे.

भटके विमुक्त आदिवासी समाजाची जनगणना करावी, स्वतंत्र मंत्रालय व बजेटमध्ये स्वतंत्र आर्थिक तरतूद करावी तसेच गायरान, गावठाण, वनजमिन व इतर निवासी अतिक्रमणांचे नियमितिकरन करण्यात यावे, या माण्ण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करुन उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांना निवेदन देण्यात आले.

प्रत्येक जिल्हातील भटके विमुक्त व आदिवासींच्या पालांवर व वाड्या वस्त्यांवर जाऊन जनजागृती करणार आहेत. अहमदनगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झालेल्या आंदोलनात पद्मश्री पोपटराव पवार व सी एस आर डी चे प्राचार्य डॉ. सुरेश पठारे यांनीही भटके विमुक्त आदिवासींच्या विविध माण्ण्यांना पाठिंबा व शुभेच्छा दिल्या. वेळ प्रसंगी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, राज्यपाल व राष्ट्रपती यांच्या सोबत भटके विमुक्त संयोजन समितीच्या सदस्यांची चर्चा घडवून आणू असे पद्मश्री पोपटराव पवार यावेळी म्हणाले.

यावेळी शैला यादव, बापूसाहेब ओहोळ, द्वारका पवार, मुमताज शेख, अनिल जाधव, सिमा जाधव, अजिनाथ शिंदे, लता सावंत, दादू मदारी, कादिर मदारी, विक्रम कांबळे यांचीही भाषणे झाली. या संवाद यात्रेत १२ बलुतेदार, नामिक समाज संघटना, ओबीसी, व्ही जे एन टी संघटना, अहमदनगर सोशल फोरमच्या संघा मेढे व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बापूसाहेब ओहोळ यांनी प्रास्ताविक केले. संतोष चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. उमाताई जाधव यांनी आभार मानले.

संवाद यात्रेच्या यशस्वितेसाठी सचिन भिंगारदिवे, वैजिनाथ केसकर, संगीता केसकर, पल्लवी शेलार, अजिनाथ शिंदे, राजू शिंदे, बाबुलाल शिंदे, दिगंबर कानडे, दशरथ वायकर, तुकाराम पवार, विशाल पवार, छाया भोसले, ऋषिकेश गायकवाड, दिसेना पवार, सी.एस.आर.डी. चे प्रा. रमेश वाघमारे, सॅम्युअल वाघमारे व एम.एस. डब्ल्यूच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले.

गृहिणी

आरोग्य

निद्रानाशाचा त्रास होत असेल तर...

तरुणांपेक्षा म्हातारयांना झोप कमी येणे हे अगदी स्वाभाविक आहे. हिवाळ्यात किंवा उन्हाळ्यात झोपेचा प्रयत्न करूनही त्यांना तासन्तास झोप येत नाही. यासाठी दिवसभरात भरपूर शारीरिक कष्ट करावेत. दुपारी वा संध्याकाळी कॉफी किंवा बिनदुधाचा चहा घेऊ नये. रात्री निजायला जाण्यापूर्वी एक पेला दूध घ्यावे. शक्य असल्यास झोपण्यापूर्वी ऊन पाण्याने आंघोळ करावी. याने निद्रानाश कमी होईल.

पाककला

चिंचेची जेली

साहित्य : एक वाटी चिंच, दोन वाट्या साखर, सहा वेलदोडे.

कृती : चिंच साधारण पिकलेली बघून घ्यावी. तीत एक वाटी पाणी घालून सुमारे दहा मिनिटे मंद आचेवर उकळत ठेवावी. थंड झाल्यावर चिंचेच्या साली, शिरा व चिंचोके काढून टाकून ती कोळून घ्यावी. या कोळाच्या दुप्पट साखर मोजून घालावी.

हे मिश्रण कल्हईच्या किंवा स्टीलच्या पातेल्यात शिजत ठेवावे. आटत आल्यावर वेलदोड्याची पूड घालावी. ब्रेडबरोबर ही जेली चांगली लागते.

वास्तू

...तर या गोष्टी ठरतील बाधक

* पूर्व, ईशान्य व उत्तर भागात स्वयंपाकघर, शौचालय असेल तर आरोग्यनाश, धननाश व शैक्षणिक प्रगतीमध्ये अडथळा संभवतो.
* पूर्व दिशेस संडास, कचराकुंडी, दगड असेल तर अधिकार भ्रष्टता, नेत्ररोग, हृदयविकार, रक्तविकार, उष्णता इत्यादी संभवतात.

सल्ला

चिकवड्या, गव्हाच्या कुरडया अथवा बटाट्याचा कीस वाळण्यासाठी कापडावर घालण्याऐवजी प्लॅस्टिकच्या कागदावर घातल्यास हे जिन्नस चटकन वाळतात.

सौंदर्य

डोळ्यांखाली सुरकुत्या पडू नये म्हणून बदाम दुधात उगाळून त्याची पेस्ट डोळ्यांखाली लावावी. सुकल्यावर धुऊन टाकावी. सुरकुत्या निश्चित कमी होतील.

संकलक : अँड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. ६ सप्टेंबर २०२४

हरितालिका तृतीया, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, भाद्रपद शुक्लपक्ष, हस्त ०९।२५, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.

राशिभविष्य

मेष : आज आपणास कठोर श्रम करावे लागतील. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल. मागील उधारी वसुल होईल.

वृषभ : आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. मित्रांमध्ये होणारे वाद आपल्या संबंधासाठी वाईट ठरतील. वाहन अपघात होईल.

मिथुन : व्यस्त राहाल. कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. आजचा दिवस आर्थिक कार्यासाठी चांगला आहे पण काही देवाण–घेवाण करू नका.

कर्क : एखाद्या जीवलगाबरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न करा.

सिंह : चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीशी भेट आपल्यासाठी आनंदाची ठरेल.

कन्या : काळजीपूर्वक कार्य करा. नोकरीत असलेल्या व्यक्तींनी कार्यात सहकार्य घेऊन चालावे.

तूळ : हातावर हात ठेवल्याने कार्य होणार नाही. कोणत्याही कार्यात बेपर्वाईने वागू नका. शेजाऱ्याशी वाद होण्याची शक्यता आहे.

वृश्चिक : शत्रू प्रभावहीन होतील. कार्यक्षेत्रात नवीन प्रोजेक्टची सुरुवात करण्यापूर्वी यथायोग्य विचार कराल.

धनु : महत्वपूर्ण कार्ये योग्य वेळी होतील. अकस्मात आलेल्या परिवर्तनांमुळे आपल्या जीवनाला नवीन दिशा मिळेल.

मकर : आजच्या दिवसाचा उपयोग नाती–संबंधात नवीन उर्जा भरण्यासाठी करा. आरोप–प्रत्यारोपांपासून दूर रहा.

कुंभ : भावनात्मक स्वभावाचे असल्याम ळे आपणास नुकसान होणे शक्य आहे म्हणून मनावर नियंत्रण ठेवा.

मीन : आपणास आकस्मिकरीत्या इतर लोकांबरोबर चांगला काळ व्यतीत होईल. मागील घेतलेले कष्ट आज फळास येतील.

संकलक : अँड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

हसा आणि शतायुषी व्हा!

...वाईट नाही का दिसणार?

शिक्षक :– बाळू, तू सारखी आपली पॅन्ट हातांनी वर ओढत आहेस, फार वाईट दिसते ते!

बाळू :– सर, वर ओढली नाही तर ते आणखी वाईट नाही का दिसणार?

...चला करू स्पर्धा परीक्षांची तयारी

* धारापुरी (एलिफंटा) लेणी असलेला जिल्हा – रायगड
* भारतीय राज्यघटना अस्तित्वात आली ते वर्ष – २६ जानेवारी १९४९
* वास्को द गामा भारतात प्रथम दाखल झाला ते ठिकाण – कालिकत
* इंद्राची नगरी या नावाने ओळखले जाते ते शहर – अमरावती (महाराष्ट्र)

संदर्भ – 'कॉम्पिटिशन सक्सेस (जनरल नॉलेज) इंग्रजी मासिक
मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

फिल्मीचक्कर क्र. ११५३ सौ. शैलजा कुलकर्णी

आडवे शब्द :– १) देव मुखर्जी, प्राण यांचा अशोककुमार, अलका, एक चित्रपट ५) ++ दौर (चित्रपटाचे नाव) ७) काला +++ (चित्रपटाचे नाव) ८) राजा और ++ (चित्रपटाचे नाव) ९) रजनीकांत, पद्मिनी कोल्हापुरे, कादरखान आदींचा एक चित्रपट १०) सईद जाफरी, हेमामालिनी यांचा एक चित्रपट

उभे शब्द :– १) धर्मेंद्र, माला सिन्हा यांचा एक चित्रपट २) संजीवकुमार, अनिता राज, शत्रुघ्न सिन्हा यांचा एक चित्रपट ३) दूर +++ + ++ मे (चित्रपटाचे नाव) ४) एक ++ दो माली (चित्रपटाचे नाव) ६) जोधा ++++ (चित्रपटाचे नाव) ७) +++ ++ ब्रह्मचारी (मराठी चित्रपटाचे एक नाव)

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : अँड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : ढीगभर आश्वासनांपेक्षा टीचभर मदत बरी.

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

आपल्याला चटका कशामुळे बसतो?

थंडीच्या दिवसांत स्वेटर उतरवल्यावर आपले अंग आपल्याला उबदार लागते. मात्र ताप आला असेल तर आपण 'अंग चांगलेच तापलेय' असे म्हणतो. सागरगोटे जमिनीवर घासले नि अंगाला लावले तर चटका बसतो तर हिवाळ्यात आपले कपडे गार लागतात, धातूही भांडी, एवढंच नव्हे, तर आपण एखाद्या वाहनावरून आलो तर आपले हात, गाल, नाकाचा शेंडा गार लागतो.

हे गार लागणे किंवा चटका बसणे म्हणजे आपल्या शरीराचे तापमान आणि बाहेरच्या पृष्ठभागाचे तापमान यातला फरक आपल्या मज्जासंस्थेस जाणवणे. अतिशय थंडीमुळे आपल्या चेतावाहिन्यांची टोके बधिर होतात आणि मग शरीरातल्या त्या भागाची संवेदना नष्ट होते. काही वेळा येथल्या पेशी गोठून त्या कायमच्या थंडावतात, असा भाग मग शरीरापासून शस्त्रक्रियेने दूर करावा लागतो. याउलट जेव्हा शरीराच्या एखाद्या भागाला वाजवीपेक्षा जास्त उष्णता लागते त्या वेळेस शरीरातल्या पेशी प्रसरण पावतात, त्यातला द्रव तापतो. थोडक्यात म्हणजे त्यांचे रेणू जलद हालचाल करू लागतात आणि हळूहळू पेशी फुटतात. यामुळे या भागात रक्तपुरवठा वाढून तो भाग लाल दिसू लागतो. आपल्याला तापमान वाढीची जी जाणीव होते ती 'चटका' बसून. त्याचा हा दृश्य परिणाम दिसतो. ही उष्णता प्रदीर्घकाळ जास्त प्रमाणात मिळत राहिली तर कातडी जळते. आपल्या शरीराच्या कोणत्या भागास भाजून दुखापत झालीय, ती किती प्रमाणात झालीय, यावरून भाजल्याने माणूस दगावणार की नाही याचा अंदाज डॉक्टर व्यक्त करतात. ६० टक्क्यांपेक्षा जास्त भाजलेला माणूस गंभीर जखमी समजला जातो.

आळशी गाढव

एक कुंभार होता. त्याला एक गाढव खरेदी करायचे होते. गाढव खरेदी करण्यासाठी तो कुंभार शहरात गेला. ज्या दिवशी तो शहरात गेला त्याच दिवशी तिथला बाजार होता. त्या बाजारात सर्व प्रकारची गुरे विकायला आलेली होती. त्यात बऱ्याच प्रमाणात गाढवांचादेखील समावेश होता. कुंभाराला गाढव बघून हायसे वाटले. कारण त्याची फेरी वाया जाणार नव्हती.

तो कुंभार गाढव पाहात फिरला. फिरता फिरता तो एका गाढवाच्या विक्रेत्याजवळ आला व त्याने विक्रेत्याला म्हटले, माझ्याकडे आधीच पाच गाढवे आहेत. परंतु मला अजून काही गाढवं हवी आहेत. कारण माझ्याकडील पाच गाढवांपैकी दोन गाढवं अतिशय आळशी आहेत. उरलेली तीन गाढवं खूप कष्टाळू आहेत. परंतु मला भरपूर काम करणारे गाढव हवे आहे, जेणेकरून मला जास्त फायदा होईल. '

त्याचे बोलणे ऐकून विक्रेत्याने अगदी तरुण गाढव देखणे गाढव त्या कुंभाराला दाखविले आणि म्हणाला, मालक, तुम्ही एकदम बेफिकीर होऊन हे गाढव घेऊन जा. याची कामाबद्दल काहीच तक्रार नसेल.

कुंभाराने म्हटले की, 'एवढ्या खात्रीशीरपणे कसे सांगत आहात? या गाढवाने देखील काम नाही केले तर?'

विक्रेता उत्तरला, 'मालक, तुम्ही वाटल्यास दोन दिवस याच्याकडून काम करून घ्या. नंतर आवडल्यास विकत घ्या.' कुंभाराला त्याचे म्हणणे पटले आणि त्याने गाढव आपल्या घरी नेले. घराच्या मागे एक वाडा होता. त्या वाड्यात त्याची आधीची पाच गाढवं बांधली होती. त्याचे नवीन गाढव त्या वाड्यात सोडले. नवीन आणलेल्या गाढवाची तो गंमत बघू लागला. तास–दोन तास निघून गेल्यानंतर त्याने गाढवाला आपल्या वाड्यातून काढले आणि परत आल्या पावली शहरातल्या त्या विक्रेत्याला सांगितले की, 'हे तुमचे गाढव परत घ्या. मला हे गाढव नको. मला चांगले उमदे जनावर द्या. हे गाढव आळशी आहे.' कुंभाराची गोष्ट ऐकून तो विक्रेता चकित झाला आणि म्हणाला, 'अवघ्या ४ तासांत तुम्हाला कसे समजले? मी तर गाढव दोन दिवस घरी ठेवायला परवानगी दिली होती. '

त्यावर कुंभार म्हणाला, 'याला इतर गाढवांच्या बरोबर वाड्यात सोडले तेव्हा त्याने गेल्या गेल्या आळशी गाढवांशी मैत्री केली. त्यांच्याशी मजेत खेळू लागला. त्यांच्यासोबतच चारा खाऊ लागला. त्यावरून मी ओळखले की हे गाढव देखील आळशी आहे. विचित्र खुलासा ऐकून तो विक्रेता आश्चर्यचकित होऊन कुंभाराकडे पहात म्हणाला, 'धन्य आहे तुमच्या बुद्धी चातुर्याची.'

तात्पर्य : माणूस कोणाच्या संगतीत राहातो यावरुन लोक त्याच्या सामाजिक प्रतिष्ठेचा अंदाज लावत असतात.

जीवन चक्र – मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)

आदिकाल से ही लोगों को इस विद्या का ज्ञान रहा है। बहुत से ऐसे भाग्यशाली लोग हैं, जिन्होंने अपने अंतर में आत्मिक एकता और शांति की खोज की है। अपने असली रूप को जानने और प्रभु को पाने के बाद वे इसका ज्ञाती (निजी या व्यक्तिगत) अनुभव दूसरों को भी कराते हैं। वे आनन्द से इस कदर भर जाते हैं कि वे चाहते हैं कि हर व्यक्ति इस आनन्द का अनुभव करे। ऐसी करुणा से परिपूर्ण आत्माओं को हम संत, महात्मा, पैगम्बर या सत्गुरु के नाम से जानते हैं। वे हमारे उन दुःख–दर्दों को मिटाना चाहते हैं, जो हम अपनी आत्मा के वास्तविक स्वभाव को भूलकर भोग रहे हैं। उन सबने अंतर्मुख होने का रास्ता अपनाया, ताकि वे अपनी आत्मा के असली स्वभाव को जान सकें। विभिन्न धर्मशास्त्रों के अनुसार इसका का चिंतन, पूजा या ध्यान कहा जा सकता है। इसको हम किसी भी पकारें, आत्मा को पहचानने का तरीका एक ही है। इसके लिए अंतर्मख होना है। जब कभी संत–महात्मा इस दुनिया में आए, उन्होंने ने शिष्यों को अंतर्मुख होने का तरीका बताया। दुर्भाग्यवश जब ये इस्तियाँ इस भौतिक जगत को छोड़कर चली गईं, तो उनके अनुयायी उनके बताए हुए रास्ते से भटक गए। नतीजा यह हुआ हम असलियत को भूलकर, बाहर के रस्मो–रिवाज़ों में लग गये, जिनको कि हम गिरजाघरों, मंदिरों और अलग–अलग पूजा स्थानों पर पूजा करते हैं। हम बहुत खुशनसीब हैं कि आज के युग में भी हम ध्यान की विद्या सीख सकते हैं। इस विद्या की बख्शीश खुलेआम दी जाती है और उससे हज़ारों–लाखों लोगों ने फायदा उठाया है। इसी ध्यान के ज़रिये हम (आत्मा) अपने अंतर के अमृत में, जो प्रभु के परमसुख, ज्योति और खुशी से भरा हुआ है, स्नान करते हैं और हमारी आत्मा उस प्रभु में लीन हो जाती है।

प्रभु से मिलाप – जब हमारी आत्मा परमात्मा से मिलकर पूर्ण परमसुख को प्राप्त करती है तो उस अवस्था का सीमित भाषा में वर्णन करना कठिन है। हम प्रभु की शांति, संतोष और दया से परिपूर्ण हो जाते हैं। जब आत्मा का परमात्मा से मिलन होता है, तब आत्मा पूरी तरह संतुष्ट हो जाती है और हमेशा के लिए प्रभु के प्यार और खुशी में मग्न हो जाती है। आत्मा की इस सुखद दशा का कुछ आभास हम इन उदाहरणों से कर सकते हैं कि जैसे माता–पिता अपने बच्चे को अपनी बाहों में पाकर या नवविवाहित दूल्हा–दुलहन आपस में मिलकर एक अनोखा सुख प्राप्त करते हैं।

(कृपाल आश्रम, अहमदनगर)

शुद्ध जीवन जीने के मंत्र (शांति)

मानसिक शक्ति– संकल्प–२

वैज्ञानिकों व महापुरुषों ने जो शक्ति दिखाई है, वह तो शून्य मात्र है, वास्तविक शक्ति अनंत है। व्यस्नी और अपराधी जैसी सूझबूझ दिखाते हैं वह बाजीगरी से कम नहीं है। वास्तव में मानसिक शक्ति कितनी है यह जानना कठिन है। मनुष्य ही है जो परमाणु जैसी शक्ति को प्रकट करता है। महात्मा गाँधी दुबले पतले थे फिर भी करोड़ो मनुष्यों के मानसिक स्तर को बहुत शक्तिशाली बनाया है। योगियों ने व्यक्तियों, परिस्थितियों और वातावरण को बदला। जिस मनुष्य ने अपने को जान लिया उसने सब–कुछ जान लिया। बंदूक की नली द्वारा सही निशाने पर छोड़ी गई बारूद भयंकर विस्फोट करती है तथा अपनी शक्ति का परिचय देती है। आत्म शक्ति को एकाग्र किये बिना उसका लाभ नहीं उठा सकते। योग साधना, एकाग्रता तथा मौन जैसे प्रयोग करके मानसिक शक्ति को प्रकट किया जा सकता है। योगी अपनी दिव्य शक्ति का एक कण भी बिखरने नहीं देते। महान व्यक्ति अपना समय निरर्थक कामों में बर्बाद नहीं करते। योगी एकाग्रता द्वारा अपनी व दूसरों की समस्याओं का निराकरण करते हैं। कठिनाई तब होती है जब कोई योगी बनकर औसत व्यक्ति से अधिक संकल्प खर्च करता है। काम से जी चुराता है। अहंकार की पूर्ति के लिये अपना आत्म विज्ञापन करता है। घोर संसारी बन जाने पर भी पल–पल उपहास, आरोप तथा अन्य संकल्प झेलने पड़ते हैं।

स्थूल ऊर्जा विद्युत, चुम्बक, गर्मी, प्रकाश के रूप में देखी जाती हैं। इन शक्तियों का उत्पादन कहीं और होता है। तेल डाल देने से पानी की सतह पर फैल जाता है। थोड़ा सा जहर सारे शरीर में फैल जाता है। ऐसे ही शांति और प्रेम के शब्द जब हम मन में दोहराते हैं तो वह शरीर की हर कोशिका तथा ईथर द्वारा पूरे ब्रह्मांड में फैल जाते हैं। यह शब्द अच्छाई से टकरा–टकरा कर शक्तिशाली बन जाते हैं जैसे जंगल में माचिस की तीली से निकली आग . प्रचंड रुप ले लेती है। शांति और प्रेम दूसरे व्यक्तियों एवं प्रकृति के परमाणुओं को बदलती है।

संगीत का शरीर व मानसिक स्वास्थ्य पर प्रभाव पड़ता है। ऐसे ही शांति, प्रेम तथा सकारात्मक संकल्प एक संगीत की तरह प्रभाव डालते हैं। ध्वनि यंत्र इसी नियम पर बनाये जाते हैं। अग्नि शक्ति का केन्द्र है। इस से भोजन बनता है, कारखाने चलते हैं, बारूद बनता है। अग्नि ही जीवन है। ऐसे सकारात्मक शब्द से अनंत गर्मी पैदा होती है जो बुराईयों को, बरी वत्तियों को, बुरे संस्कारों को नष्ट कर देती है। भौतिक विज्ञान बाहरी जगत को प्रभावित करता है। आध्यात्मिक विज्ञान आन्तरिक क्षेत्र को प्रभावित करता है। भौतिक विज्ञान सुख स्वधर्म का उत्पादन करता है।

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

चहा

कोमेलिया थिआ नावाच्या छोटद्या वृक्षाची पाने तोडून त्यापासून चहा तयार केला जातो. म राठीमध्ये 'चहा', हिंदीमध्ये 'चाय', इंग्रजीमध्ये 'टी', तर शास्त्रीय भाषेमध्ये कॅमिलिआ सिनेसिस या नावाने ओळखला जाणारा चहा 'थिआसी' या कुळातील आहे. सुमारे १५०० ते १७०० वर्षांपूर्वी चिनी लोकांनी चहा हे पेय शोधून काढले आहे, असे मानतात. भारतामध्ये आसाम, केरळ, दार्जिलिंग, बंगळूरू, डेहराडून या ठिकाणी पर्वतमय भागात चहाची लागवड केली जाते.

चहा बनविण्याची प्रक्रिया : चहाच्या अनेक जाती आहेत. त्यामधील बादशाही चहा हा सर्वात उत्तम समजला जातो. चहाचे वृक्ष थंड हवेत पर्वतावर लावले जातात. चहाची नाजूक पाने मोडून तोडली जातात. ती सुकविली जातात. त्यानंतर त्यांना गरम करण्यात येते. या प्रक्रियेमुळे चहाच्या पानांतील सुगंध व स्वाद वाढतो. चहाची किंमत ही त्याच्या चुन्यावर व सुगंधावर अवलंबून असते. चहाचा चुरा जेवढा मोठा तेवढी किंमत जास्त, म्हणून मोठा चुरा, लहान चुरा, बारीक पावडर इत्यादी प्रकारांत त्याची विभागणी केली जाते. बारीक पावडर स्वरुपातील चहामध्ये टॅनिक ॲसिडचे प्रमाण जास्त असते. हे टॅनिक ॲसिड शरीरावर विषाप्रमाणे काम करते, त्यामुळे सहसा पावडर स्वरुपातील चहा खरेदी करू नये. चहामध्ये असणाऱ्या कॅफिन, टॅनिक ॲसिड व सुगंधित तेलद्रव्यांमुळे चहा मादक होतो, तरीही चहा आणखी मादक, कडक बनविण्यासाठी कारखानदार त्याच्यावर टॅनिक ॲसिड व कॅफिनचे कृत्रिमरीत्या वेगवेगळे थर चढवितात व त्यात भेसळ करतात. या चहा बनविण्याच्या रासायनिक प्रक्रियेमुळे नैसर्गिकरित्या त्यांच्या पानांमध्ये असलेली प्रथिने नष्ट होतात आणि त्यामुळे चहामध्ये कसलेच कोणतेही शरीरास आवश्यक असलेले पोषक घटक राहत नाहीत. चप्पल बनवितना चामडे घट्ट व टशक केले जाते. यालाच चामडे कमावणे असे म्हणतात आणि यासाठी टॅनिक ॲसिड वापरले जाते. आपणही कायम चहा पिऊन एक प्रकारे टॅनिक ॲसिडच पित असतो व शरीरातील रक्तवाहिन्यांचे, लवचिक अवयवांचे टॅनिंग करीत असतो. यामुळे रक्तवाहिन्यांचा, मांसपेशींचा लवचीकपणा कमी होऊन काठीण्य निर्माण होते. पर्यायाने मूळव्याध, रक्तदाब, हाय कोलेस्टेरॉल, हृदयरोग हे आजार निर्माण होतात.

गुणधर्म : चहामध्ये टॅनिक ॲसडि (६–१२%), कॅफिन (१.६%), उडनशील तैलद्रव्ये व सूक्ष्म प्रमाणात थिओफायलिन असते. चहाचा स्वाद त्यामधील तैलद्रव्यांवर अवलंबून असतो. चहाचा रस हा कषाय, विपाक कटू आणि वीर्य उष्ण आहे. रोज अर्धा कप चहा पिण्याने उत्साह वाढतो म्हणून बुद्धिजीवी व्यक्तींचे चहा हे आवडते पेय आहे. परंतु चहा प्याल्याने त्याची व्यसनाधीनता निर्माण होते व त्यातूनच विविध आजारांची लागण होते. चहा प्यायचाच असेल, तर दिवसभरातून फक्त अर्धा कप सकाळी व अर्धा कप संध्याकाळी असा घ्यावा. त्यासाठी ग्रीन टीचा वापर करावा. ग्रीन टी म्हणजे चहाच्या झाडाची तोडलेली कोवळी सुकविलेली पाने. या ग्रीन टीवर कोणतीही रासायनिक प्रक्रिया केलेली नसते. त्यामुळे या ग्रीन टी मधून शरीराला आवश्यक असलेली ॲन्टी ऑक्सिडंट मिळतात. त्यामुळे शरीर उत्साही राहून चहामधील नैसर्गिक मूलद्रव्ये मिळतात. रासायनिक प्रक्रिया केलेला चहा सहसा पिऊ नये. चहा जितका जास्त प्रमाणात उकळला जातो, तितके अधिक टॅनिक ॲसिड चहामध्ये उतरते.

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मल–महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं– ८७९३४००४००

बुऱ्हाणनगर तुळजाभवानी देवी मंदिरात नवरात्र उत्सवाच्या तयारीची लगबग सुरु

श्री तुळजाभवानी देवीच्या नव्या पालखीसाठी बुऱ्हाणनगरहून पौराणिक दांडा राहुरीकडे रवाना

नवरात्र उत्सवासाठी श्रीक्षेत्र तुळजापूरकडे जाणाऱ्या देवीची नवी पालखी तयार करण्यासाठी पालखीचा पौराणिक दांडा बुऱ्हाणनगरच्या तुळजाभवानी देवी मंदिरातून राहुरीकडे मगर कुटुंबीयांनी विधिवत पूजा करून रवाना केला.

नगर – नगरची कुलस्वामिनी असलेल्या बुऱ्हाणनगरच्या तुळजाभवानी देवी मंदिरात ३ ऑक्टोबरपासून सुरु होणाऱ्या नवरात्र उत्सवाची जय्यत तयारी सुरु झाली आहे. बुधवारी भाद्रपद शुद्ध प्रतिपदेच्या मुहूर्तावर श्रीक्षेत्र तुळजापूर येथील तुळजाभवानी देवीची नवी पालखी बनवण्यासाठी सुमारे २०० वर्षांपूर्वीचा ऐतिहासिक दांडा बुऱ्हाणनगरहून राहुरीकडे रवाना करण्यात आला.

राहुरीमध्ये या ऐतिहासिक दांडाचाला पालखीचा नवा पाळणा लावण्यात येतो. या पौराणिक दांडाची विधिवत पूजा व आरती बुऱ्हाणनगरच्या तुळजाभवानी देवी मंदिराचे प्रमुख पुजारी ॲड.विजय भगत व सौ.दुर्गा भगत यांनी केली. यावेळी आई राजा उदो उदोच्या गजर करण्यात आला. यावेळी पुजारी ॲड.अभिषेक भगत, कुणाल भगत, राजेंद्र भगत आदींसह भगत परिवार व भाविक उपस्थित होते.

यावेळी माहिती देताना ॲड.विजय भगत म्हणाले, महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजापूरच्या भवानीदेवीच्या पालखीचा मान गेल्या एक हजारांहून अधिक वर्षांपासून बुऱ्हाणनगरच्या भगत कुटुंबाच्या तुळजाभवानी देवी मंदिराकडे आहे. दरसाच्या दिवशी तुळजाभवानी देवीच्या सीमोल्लंघना साठी नगरघ्रून दरवर्षी ही पालखी जात असते. या पालखीचा दांडा हा २०० वर्षाचा जुना आहे. दरवर्षी फक्त पालखीचा पाळणा नव्याने बनवला जातो. यासाठी लागणारे सर्व साहित्यांसह पालखीचा हा ऐतिहासिक दांडा राहुरीच्या सूतारा कडे नवा पाळणा बनवण्यासाठी विधिवत पूजा करून रवाना केला आहे. वंशपंरपरेने एक हजार वर्षांपासून भगत कुटुंबीय ही परंपरा जपत आहे.

ॲड. अभिषेक भगत म्हणाले, नवरात्री उत्सवा निमित्त तुळजाभवानी देवीच्या पालखीचा नवा पाळणा बनवून झाल्यावर राहुरी येथून तुळजाभवानी देवीच्या पालखी सोहळ्यास १८ सप्टेंबर पासून सुरवात होत आहे. ही पालखी राहुरी, पारनेर व नगर तालुक्यातील ४० गावांना सालाबादप्रमाणे जाऊन नवरात्रीच्या तिसऱ्या माळेस बुऱ्हाणनगर येथील तुळजाभवानी देवीच्या या मंदिरात येते. येथून ही पालखी श्रीक्षेत्र तुळजापूरकडे रवाना केली जाते. सीमोल्लंघनास सक्षात तुळजाभवानी देवीच या पालखीत विराजमान होत असल्याने या पालखीत देवीची कोणतीही मूर्ती किंवा फोटो ठेवला जात नाही. ज्या गावांमध्ये ही पालखी जाते त्याठिकाणी भव्य यात्रा भरवण्यात येते. हजारो भाविक या पालखी सोहळ्यात सहभागी होतात.

यावेळी देवीचे पुजारी ॲड. किरण भगत, सुभाष भगत, अर्जिक्य भगत, कुणाल भगत, ॲड. संकेत भगत, कविता भगत, अंकिता भगत, वैभवी भगत व वेद भगत उपस्थित होते.

तुळजाभवानी देवीच्या पालखीचा राहुरी, पारनेर व नगर तालुक्यात होणारा प्रवास पुढील प्रमाणे – ११ ते १९ सप्टेंबर राहुरी, २० सप्टेंबर तनमर आखाडा, २१ सप्टेंबर पिंपरी अवघड, २२ सप्टेंबर वांबोरी, २३ सप्टेंबर मांजरी, २४ सप्टेंबर ताठेमळा, २५ सप्टेंबर भाळवणी, २६ सप्टेंबर दवडपुरी, २७ सप्टेंबर टाकळी ढोकेश्वर, २८ सप्टेंबर जामगाव, २९ सप्टेंबर सुपा, ३० सप्टेंबर पिंपळगाव कौडा, १ ऑक्टोबर भोयरे पठार व हिवरे बाजार, २ ऑक्टोबर टाकळी खातगाव, ३ ऑक्टोबर हिंगणगाव व हमीदपूर, ४ ऑक्टोबर नगर शहर, ५ ऑक्टोबर बुऱ्हाणनगर व नगरदेवळे, ६ ऑक्टोबर वडारवाडी, बारबाभळी, केकती व शहापूर, ७ ऑक्टोबर रांजणी व माथणी, ८ ऑक्टोबर कौडगाव, जांब व पारेवाडी, ९ ऑक्टोबर दरेवाडी व वाकोडी, १० ऑक्टोबर वाणीनगर, निंबळक व सारसनगर,पाईप लाईन रोड येथून तुळजापूरकडे रवाना, १२ ऑक्टोबर रोजी विजयादशमीला तुळजापूर येथील श्रीसंत जनकोजी भगत यांच्या समाधी पासून देवीच्या सीमोल्लंघनासाठी श्री तुळजाभवानी मंदिराकडे प्रस्थान व रात्री १२ वाजता मिरवणूक प्रारंभ, अशी माहिती कुणाल भगत यांनी दिली.

नगरच्या आरोग्य शिक्षिका... श्रद्धा देडगांवकर

प्रत्येकाच्या आयुष्यात शिक्षकांचे महत्व असते. शालेय दशेपासून ते अगदी डिग्री मिळेपर्यंत शिक्षक आपल्याला शिक्षकांचे पाठबळ मिळते. पुस्तकी ज्ञान देऊन ते आपल्याला सर्वांत्तम शैक्षणिक कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहून देतात. त्यामुळे शिक्षक आपले खऱ्या अर्थाने जीवन घडवतात. पण यात बरोबर आनंददायी जीवनाचे धडे शिकवणारे शिक्षकही आयुष्यात महत्वाचे असतात. नगरमधील श्रद्धाज फोक फिटनेसच्या श्रद्धा देडगांवकर या शिक्षिका आम्हाला लाभल्या. ज्यांनी अनेक महिला, युवतींना आरोग्यदायी राहण्याची शिकवण दिली. त्या खऱ्या अर्थाने नगरमधील युवती, महिलांसाठी आरोग्य शिक्षिका आहेत.

आजच्या काळात आरोग्य हीच मोठी धनसंपदा मानली जाते. आरोग्य कसे जपावे व स्वतःला नेहमी ताजेतवाने व ऊर्जदायी ठेवावे याचे ज्ञान श्रद्धा देडगावकर देत असतात. श्रद्धाज फोक फिटनेस द्वारे हजारो युवती, महिलांना त्यांनी फिटनेस मंत्र दिला आहे. त्या खरोखरच्या आरोग्य गुरू आहेत. श्रद्धाज फोक फिटनेस येथे सकाळी व संध्याकाळी लहान मुलींपासून मोठ्या महिलांच्या बॅचेस सुरू असतात. आम्ही मागील ४ वर्षांपासून या बॅचमध्ये सहभागी होते. शारीरिक व मानसिक स्वास्थ्य राखायचे तर नियमित व्यायाम महत्त्वाचा असतो. पण कोणी कितीही प्रयत्न केले तरी नियमित व्यायाम होत नाही ही वस्तुस्थिती आहे. रोज्च्या व्यायामाचा कंटाळा येतो. याच मानसिकतेचा सखोल अभ्यास करून देडगांवकर यांनी अनोखी शक्कल लढवली आणि व्यायामाला रंजक केले आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे देडगांवकर यांच्या चेहऱ्यावरील प्रसन्न हास्य. त्या कायम हसतमुख असतात आणि इतरांनाही आनंदी रहायला शिकवतात. त्यामुळे त्यांच्या संपर्कात आलेल्या प्रत्येकीला याचा अनुभव येतो.

पारंपरिक लोकनृत्यातून फिटनेस मंत्र देणाऱ्या श्रध्दाज फोक फिटनेस येथे लोकनृत्यातून क्रॉस फिट ट्रेनिंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे. यात वैयक्तिक तसेच ग्रुपलाही मार्गदर्शन केले जाते. फिटनेससाठी याठिकाणी विविध प्रकार घेतले जातात. व्यायाम करणे आनंददायी वाटावे यासाठी लेझीम, चेअर डान्स, दुपट्टा, स्टिक वर्कआउट शिकवले जातात. अतिशय आनंदी वातावरणात सर्व युवती, महिला याठिकाणी व्यायाम करत असतात. झुंबा डान्स, लोकनृत्य, रास गरबा, दांडिया, एरोबिक्स असे अनेक प्रकार त्यांच्या जादुई गोतीद्वीत आहेत. त्यामुळे आपण व्यायामासाठी विशेष काही करतो असे वाटतच नाही. सात्त्याने नवनवीन उपक्रम राबविण्यात देडगांवकर यांचा हातखंडा आहे. त्यांनी युवती, महिलांचे ढोल पथकही तयार केले आहे. दरवर्षी गणेशोत्सवात माळीवाडा येथील विशाल गणपती समोर या ढोल पथकाचे सादरीकरण होते. माझ्यासह नगरमधील अनेक महिलांना आनंददायी फिटनेस मंत्र देणाऱ्या श्रद्धा देडगांवकर यांना शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

– **सौ. स्वाती प्रमोद गांधी**, नगर

राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार नगर येथील बाळू कोतकर यांना जाहीर

नगर – ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था टाकळीभान (ता. श्रीरामपूर) यांच्यावतीने यंदाचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार ठकारवाडी (ता.पारनेर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक बाळू माधव कोतकर यांना देण्यात आला आहे.

शैक्षणिक क्षेत्रातील बहुमोल योगदान व शालेय विकासात्मक कामगिरीबद्दल ज्ञानज्योती संस्थेने ५ सप्टेंबरला शिक्षक दिनाचे औचित्य साधत आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी बाळू कोतकर यांची निवड केली. पुरस्कार वितरण सोहळा १५ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता रुख्मीनी माधव मंगल कार्यालय, टाकळीभान येथे होणार आहे.

ऑल इंडिया उलमा बोर्ड सामाजिक विभागाच्या अध्यक्षपदी राजू जहागीरदार तर उलमा विभाग अध्यक्षपदी काज़ी मुफ्ती नईम असगर अली

नगर – नुकत्याच मुंबई येथे घेण्यात आलेल्या ऑल इंडिया उलमा बोर्ड रजिस्टर्ड बैठकीत अहमदनगर शहरातील राजू जहागीरदार यांची अहमदनगर सामाजिक विभागाचे अध्यक्षपदी तर उलमा बोर्डच्या विभाग अध्यक्ष काज़ी मुफ्ती नईम असगर अली यांची नियुक्ती ऑल इंडिया उलमा बोर्डचे प्रमुख व जनरल सेक्रेटरी अंजर अनवर खान यांच्या उपस्थितीत व मुंबई येथील पदाधिकाऱ्यांच्या एक मताने निवड करुन नियुक्तीचे पत्र देण्यात आले.

यावेळी माहिम हाजी अली दरगाहचे अध्यक्ष सुहेल खंडवानी, मेमन फेडरेशनचे अध्यक्ष इकबाल मेमन, एमआयएम चे प्रवक्ते वारिस पठान आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

ऑल इंडिया उलमा बोर्ड सामाजिक विभागाच्या अध्यक्षपदी राजू जहागिरदार तर अध्यक्षपदी काझी मुक्ती नईम असगर अली यांना नियुक्तीचे पत्र देताना जनरल सेक्रेटरी अंजर अनवर खान आदी.

उलमा बोर्ड हे येणाऱ्या काळात मशिदीमध्ये नमाज पठण करणारे इमाम व काम करणारे मुअज्जिन यांच्या पगारवाढीचा प्रश्न मार्गी लावणार असून व महाराष्ट्रातील सुप्रीम कोर्टाच्या ऑर्डरने वक्त बोर्डच्या साठी लढा उभारणार व उलमा बोर्ड हे वक्त प्रॉपर्टी दर्गा, मशीद, मदरसा आदी जागेच्या संरक्षणासाठी न्यायालयीन कमिटी उभारणार आहे व उलमा बोर्डच्या माध्यमातून अहम दनगर शहरात संघटन उभे करून सामाजिक कार्य केले जाणार असल्याची भावना नूतन पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर स्वच्छतेसह विहिरीवरील जाळ्यांची दुरुस्ती, सुरक्षा योजनांची पाहणी करताना मनपा आयुक्त यशवंत डांगे आदी.

पद्मशाली सोशल फाऊंडेशनतर्फे महाप्रसाद वाटप

नगर – अखेरच्या श्रावणी सोमवार निमित्त गांधी मैदान, महामुनी चौक येथील श्री माकंडेय मंदिरात पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने अभिषेक व महाआरती करुन दातरंगे मळा येथील श्री माकंडेय संकुल येथे महाप्रसाद (भंडारा) चे वाटप करण्यात आले. या महाप्रसादाचे ४००० भाविकांनी लाभ घेतला. यामध्ये भात, वरण (दालचा), शिरा असे पदार्थ ठेवण्यात आले होते.

श्री माकंडेय मंदिरात पद्मशाली सोशल फाउंडेशनचे माजी अध्यक्ष रोहित गुंडू व सौ.पुजा गुंडू तसेच अकाश अरकल व सौ. कोमल अरकल यांच्या हस्ते सायं. ७ वाजता अभिषेक, ७.३० वा.आरती करण्यात आली. अभिषेक आणि महाआरतीचे पौराहित्य चि.सिद्धांत लयचेट्टी यांनी केले. त्यांना सहकार्य अमित सुंकी यांनी केले.

आरती झाल्यानंतर महाप्रसादाचे वाटप (पाऊरुसामुळे गांधी मैदान ऐवजी दातरंगे मळा येथील श्री माकंडेय संकुल येथे) सौ.पुजा गुंडू व सौ.कोमल अरकल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फाऊंडेशचे सचिव अजय लयचेट्टी, इंजि. अक्षय बल्लाळ, शुभम सुंकी यांच्यासह सर्व कार्यकर्त्यांच्या हस्ते श्री माकंडेय संकुलात महर्षी चिरंजीवी भगवान श्री माकंडेय महामुनी यांची विधीवत पुजा व महाआरती करण्यात आली.

यावेळी पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टचे अध्यक्ष गणेश लकशेट्टी म्हणाले की, गेल्या ६ वर्षापासून अखेरच्या श्रावणी सोमवार निमित्त महाप्रसादाचे वाटप करण्यात येत आहे. तसेच गेल्या ११ वर्षापासून विविध सामाज उपयोगी उपक्रम राबविण्यात येते आहेत. यामध्ये रक्तदान शिबीर, नेत्रतपासणी शिबीर, वृक्षरोपण कार्यक्रम, महाआरती उपक्रम, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, गरजूंना किराणा वाटप, गरजू विद्यार्थ्यांना स्वेटर व दप्तर वाटप असे उपक्रम फाउंडेशनच्या वतीने घेण्यात येतात असे सांगून तसेच पीएसआय अनिल अलवार यांच्या पुढाकाराने युवक व युवतींना स्पर्धा परिक्षांसाठी मार्गदर्शन केंद्र पद्मशाली फाउंडेशनच्या वतीने उभारण्यात आले, असे फाउंडेशन वतीने सांगण्यात आले.

अखेरच्या श्रावणी सोमवार निमित्त महाप्रसाद कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पद्मशाली फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

शिक्षकांमुळे विद्यार्थ्यांच्या जीवनाला चांगली दिशा मिळते

छायाताई फिरोदिया यांचे प्रतिपादन; जय आनंद महावीर युवक मंडळाच्यावतीने बाई ईचरजबाई फिरोदिया प्रशालेत शिक्षक दिन साजरा

नगर – विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देण्याचे व त्यांना घडवण्याचे काम शिक्षक करत असतात. शिक्षिकी पेशा हा अतिशय पवित्र पेशा आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार उकार व ज्ञान देण्याचे पवित्र कार्य ते करतात. अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शाळांमध्ये गुणवत्तापूर्वक शिक्षण दिले जाते. संस्थेच्या शाळेत शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी मोठ्या पदांवर पोहचले आहेत. मोठे उद्योजक, व्यावसायिक झाले आहेत. संस्थेतील सर्व शिक्षकांनी अधिकाधिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावे. जय आनंद महावीर युवक मंडळ दरवर्षी शिक्षकांचा गौरव करुन खऱ्या अर्थाने शिक्षक दिन साजरा करीत आहे, असे प्रतिपादन अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी केले.

जय आनंद महावीर युवक मंडळाच्यावतीने बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेत शिक्षकदिनी शिक्षक–शिक्षिकांचा सत्कार करताना अ.ए.सो. च्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया. समवेत प्रमुख पाहूणे.

जय आनंद महावीर मंडळाच्यावतीने शिक्षक दिनानिमित्त अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या बाई इजरजबाई फिरोदिया प्रशालेतील सर्व शिक्षक, पूर्व प्राथमिक वर्गातील शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून शालेय समिती सदस्या सुनीता मुथा, मुख्याध्यापिका ज्योती सिसोदिया, मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा, उपाध्यक्ष राहुल सावदेकर, खजिनदार अमित गांधी, योगेश मुनोत, मनोज गुंदेचा, बाबालाल गांधी, कुंतीलाल राका, अजय गांधी, सत्येन मुथा, सचिन कोठारी, राज मुनोत, शुभम गट्टाणी, ओंकार बिहाणी यांच्यासह शिक्षक उपस्थित होते.

प्रास्ताविकात सत्येन मुथा म्हणाले, बाई इजरजबाई फिरोदिया प्रशालेशी मंडळाच्या सदस्यांचे जुने नाते आहे. आमचे अनेक सदस्य याच शाळेत शिकलेले आहेत. त्यामुळे शाळेप्रती खूप आत्मियता आहे. आम्हाला घडवणाऱ्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी हा कार्यक्रम घेत असतो. मंडळाच्या विविध सामाजिक, धार्मिक कार्यास छायाताई फिरोदिया परिवाराचे, शाळेचे नेहमीच सहकार्य लाभते.

स्वागत करताना सेक्रेटरी आनंद मुथा म्हणाले, शिक्षकांमुळेच प्रत्येक जण घडत असतो. शालेय दशेत शिक्षकांनी केलेले संस्कार आयुष्यात खूप उपयोगी पडतात. बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेतील अनेक माजी विद्यार्थी आज विविध क्षेत्रात भरारी घेवून कर्तबगार झाले आहेत.

मुख्याध्यापिका ज्योती सिसोदिया म्हणाल्या, शिक्षक दिनानिमित्त जय आनंद महावीर युवक मंडळाने केलेला सन्मान खूप आनंददायी आहे. मंडळाकडून दरवर्षी हा कार्यक्रम घेण्यात येतो. त्यामुळे उत्साही वाटते. शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता अधिकाधिक वाढविण्यासाठी सर्व शिक्षक मिळून नक्कीच प्रयत्न करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी शाळेतील गुणवंत शिक्षक पराग वैलायत, वैशाली निकम यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल व जय बालाजी ग्रुप, सातारा आयोजित सातारा हिल हाफ मॅरेथॉन स्पर्धेत सुवर्णपदक मिळविल्याबद्दल वैभव वाघ यांचा छायाताई फिरोदिया यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

शाळेतील चौथीचे विद्यार्थी स्वानंद सुडके व स्वरा ठाणगे यांनीही मनोगत व्यक्त करीत शिक्षक दिनाच महत्व सांगितले. त्यांचा मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात आला. परिचय व यादी वाचन शकुंतला देसरडा यांनी केले. राज मुनोत यांनी आभार मानले.

केशवराव गाडीलकर हायस्कूल आणि सखाराम मेहेत्रे विद्यालयात गणपती बनविणे कार्यशाळेत खडू शिल्पकार अशोक डोळसे गणपती कसा बनवावा या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना. समवेत उपस्थित विद्यार्थी.

गाडीलकर हायस्कूल आणि मेहेत्रे विद्यालय येथे गणपती बनविणे कार्यशाळा

नगर – केशवराव गाडीलकर हायस्कूल आणि सखाराम मेहेत्रे प्राथमिक विद्यालय सावेडी अहमदनगर येथे ४ सप्टेंबर रोजी गणपती बनविणे कार्यशाळा खडू शिल्पकार अशोक डोळसे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. यामध्ये डोळसे सरांनी गणपती कसा करावा याचे मार्गदर्शन योग्य प्रकारे विद्यार्थ्यांना केले त्यांनी विद्यार्थ्यांना मनातील गणपती प्रथम डोळ्यासमोर ठेवावा व त्यानुसार गणपती बनवावा असे सांगितले.

त्यानुसार विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे गणपती बनविले. काही विद्यार्थ्यांनी झोका खेळणारा गणपती, तर काही विद्यार्थ्यांनी दोन्ही बाजूने दिसणारा गणपती तयार केला. विद्यालयातर्फे स्वागत आणि मुख्याध्यापक अनिल गायकवाड यांनी आभार मानले.

याप्रसंगी महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीचे सचिव नामदेवराव गाडीलकर, प्राथमिक विद्यालयाच्या शिक्षिका बोराटे संगीता, बोडे मनीषा तर गाडीलकर विद्यालयाच्या सौ. देशपांडे, शिंदे व डाके उपस्थित होते.

डॉ. विखे पाटील कृषी महाविद्यालयात रॅगिंगविरोधी जनजागृती कार्यक्रम



विखे पाटील कृषी महाविद्यालयात रॅगिंगविरोधी जनजागृती कार्यक्रमात बोलताना एम.आय.डी.सी. पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक माणिक चौधरी व समोर उपस्थित विद्यार्थी दिसत आहेत.

नगर – डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कृषी महाविद्यालय, विळद घाट येथे रॅगिंगविरोधी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयात विद्यार्थ्यांना त्रास देणे, धमकावणे, खोडया काढणे, मनाला टोचणारी बोलणी करणे, लिखित स्वरूपात त्रास देणे, गैरवर्तन करणे, तसेच मानसिक त्रास देऊन विद्यार्थ्यांमध्ये भीती निर्माण करणे असे प्रकार टाळण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून एमआयडीसी पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी उपस्थित होते. मार्गदर्शन करताना माणिक चौधरी म्हणाले की, रॅगिंग हा एक गंभीर गुन्हा आहे. विद्यार्थी रॅगिंगला कंटाळून आत्मघाताचे पाऊल उचलतात, तर दोषी विद्यार्थ्यांचे भवितव्य डळमळीत होते. त्यामुळे सरकारने या संदर्भात कडक कायदे केले आहेत. शिक्षक आणि पालकांनी याकडे लक्ष देणे आवश्यक आहे आणि विद्यार्थ्यांनी अशा कृत्यांपासून दूर राहिले पाहिजे, कारण रॅगिंग हे अक्षम्य कृत्य आहे. कोणतीही तक्रार असल्यास ११२ हेल्पलाईन नंबरवर कॉल करावा. तसेच, विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा वापर शैक्षणिक उद्देशासाठीच करावा, असेही त्यांनी सांगितले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धोंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी रॅगिंगपासून दूर राहावे, आणि कोणत्याही विद्यार्थ्याला त्रास होत असल्यास त्यांनी तात्काळ महाविद्यालयात तक्रार करावी. तक्रारीवर त्वरित कार्यवाही करण्यात येईल. या कार्यक्रमाला विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

बासरीवादक डॉ.पं. केशवजी गिंडे अथांग ज्ञानसागर

वेणुरत्न, वेणुतपस्वी डॉ. पंडित केशवजी गिंडे गुरुजी यांना सादर प्रणाम!!!

पं. केशव गिंडे नावाच्या या अथांग ज्ञानाच्या सागराने आजवर अनेक बासरीवादक – बासरीनिर्मिते घडविले आणि घडवतील आहेत, त्यापैकी मी एक! गिंडे गुरुजी जणू संगीत क्षेत्रातील परिसच म्हणावे लागतील.

आध्यात्मिक, सांगीतिक, शैक्षणिक, सामाजिक, यांसारख्या अनेक क्षेत्रांचा सखोल अभ्यास असलेल्या या महान गुरुजींचा मला सहवास मिळाला/मिळतो आहे. मी गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली बी.ए. आणि एम.ए. (बासरी/संगीत) या पदव्या ललितकला केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून पूर्ण केल्या आहेत. अद्यापही माझे शिक्षण चालूच आहे.

रियाजाच्या बैठकीपासून ते कार्यक्रमाच्या बैठकीपर्यंतचे सर्वच संस्कार ते माझावर करीत असतात; हे सर्व अनुभव घेत असताना असे म्हणावेसे वाटते, 'केशवा तू बेडा कुंभार!' तू माझे मडके घडविताना एका हाताचा मायेचा अलगद स्पर्शाचा आधार, तर दुसऱ्या हाताने आकार देण्यासाठी दिलेले शाब्दिक फटके, या दोन्ही क्रियांशिवाय या मडक्याला आकार येतच नाही. आजवर त्यांनी अशी अनेक पक्की मडकी घडविली आहेत.

सरांच्या विविध बासऱ्यांच्या निर्मितीमुळे आणि वादन शैलीमुळे सरांचा एक पेटंट आणि ब्रँडही एक वेगळीच ओळख संगीत विश्वात झाली आहे. गुरुजींच्या या बासरीच्या संशोधन, निर्मिती व बासरीवादक शिष्य घडविण्याच्या कार्यात असे उदंड यश लाभो व यासाठी त्यांना आरोग्यपूर्ण असो शतायू लाभो हीच जन्मदिनानिमित्त मंगलकामना !

– **जितेंद्र प. रोकडे.**
अहमदनगर (९८९०४८७७९९)
(पं. केशवजी गिंडे यांचे शिष्य)

'समर्थ'च्या १०१ विद्यार्थ्यांनी बनविले पर्यावरणपूरक गणेश

नगर – सावेडी येथील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला माध्यमिक विभागात पर्यावरण पूरक गणपती बनवा कार्यशाळेत १०१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत गणपती बनविले. गेल्या १४–१५ वर्षापासून दरवर्षी हा कार्यक्रम निरंतर चालू आहे. प्रशालेच्या प्राचार्या तथा मुख्याध्यापिका श्रीमती संगीता जोशी यांनी पर्यावरणपूरक असणाऱ्या शाडू मातीची गणेश मूर्ती बसवण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन करत आवश्यक माहिती सांगितली.

प्रशालेतील कलाशिक्षक विवेक भारताल यांनी विद्यार्थ्यांना गणपती बनवून दाखविला व मार्गदर्शन केले. कलाशिक्षिका श्रीमती स्वाती घुले यांनी विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन केले. या कार्यक्रमास पर्यवेक्षक सुनिल कानडे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर मूर्ती बनवल्या असून यामध्ये बालगणेश, सिंहासनारूढ गणेश, उंदीरवाला गणेश, यासारखे अनेक आकार, प्रकाराचे गणपती बनवले. विद्यार्थी गणपती बनवताना अतिशय आनंदात दिसत होते.

या कार्यक्रमासाठी माध्यमिक विभागाचे शालेय समिती चेअरमन ॲड. किशोर देशपांडे व श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सचिव व प्राथमिक विभाग शालेय समिती चेअरमन सुरेश क्षीरसागर, प्रशालेच्या प्राचार्या श्रीमती संगीता जोशी, पर्यवेक्षक सुनिल कानडे,प्रशालेतील कलाशिक्षक विवेक भारताल, कलाशिक्षिका श्रीमती स्वाती घुले.(छाया – उदय जोशी)

श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला माध्यमिक विभागात पर्यावरण पूरक गणपती बनवा कार्यशाळेत १०१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत गणपती बनविले. माध्यमिक विभागाचे शालेय समिती चेअरमन ॲड. किशोर देशपांडे, श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सचिव व प्राथमिक विभाग शालेय समिती चेअरमन सुरेश क्षीरसागर, प्रशालेच्या प्राचार्या श्रीमती संगीता जोशी, पर्यवेक्षक सुनिल कानडे,प्रशालेतील कलाशिक्षक विवेक भारताल, कलाशिक्षिका श्रीमती स्वाती घुले.(छाया – उदय जोशी)

गणेशोत्सवानिमित्त उत्कृष्ट देखावा स्पर्धेचे आयोजन

बन्सीमहाराज विचार मंच
बन्सीमहाराज मिठाईवाले
विचार भारती

नगर – ७ सप्टेंबर पासून सुरु होणाऱ्या गणेशोत्सवानिमित्त विचार भारती व बन्सीमहाराज मिठाईवाले फर्मच्या संयुक्त विद्यमाने नगर शहरात उत्कृष्ट देखावा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचे हे दुसरे वर्ष आहे, अशी माहिती स्पर्धेचे संयोजक अनिल मोहिते यांनी दिली.

या गणेशोत्सवात नगर मधील सर्व सार्वजनिक गणेश मंडळांनी राष्ट्रीय विचारावरील महत्त्वाच्या बिंदूंना स्पर्श करत समाजाच्या जनजागरणासाठी विविध देखावे सादर करावेत. तसेच सामाजिक व प्रबोधनात्मक व राष्ट्रीय विचारावरील देखावे सादर करावेत. या देखाव्यांचे परीक्षण विचार भारतीची निवड समिती करून उत्कृष्ट देखाव्यांना पारितोषिक दिली जातील, अशी माहिती विचार भारतीचे सचिव सुधीर लांडगे यांनी दिली.

हिंदू समाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आणि प्रबोधनाचा विषय असलेला हा गणेशोत्सव पारंपरिक पद्धतीने कोणतेही गालबोट न लागता तसेच डीजे मुक्त साजरा होण्यासाठी विचार भारती प्रबोधनात्मक काम करत आहे, असे अध्यक्ष अरुण कुलकर्णी यांनी सांगितले.

संचालक राजकुमार जोशी म्हणाले, नगर शहरात गेल्या २५ वर्षापासून गणेशोत्सवात बन्सीमहाराज मिठाईवाले फर्मच्या वतीने उत्कृष्ट देखावा स्पर्धेचे आयोजन करीत आहोत. मात्र करोना नंतर ही स्पर्धा खंडित झाली होती. आता विचार भारती सारख्या प्रबोधन कार्यात अक्षेसर असलेल्या संस्थेच्या साथीने खंडित झालेली ही स्पर्धा पुन्हा सुरु करताना आनंद होत आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

यावर्षी आपल्या शहराची आणि जिल्ह्याची ओळख आता अहिल्यानगर अशी होत आहे. येणाऱ्या काळात नगरमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे 'स्टॅच्यू ऑफ युमेन एम्पॉवरमेंट' या स्मारकाची उभारणी करण्याचे नियोजीत आहे. त्यामुळे देखावे सादर करणाऱ्या मंडळांनी आपल्याला संकल्पनेतून अहिल्यादेवींच्या 'स्टॅच्यू ऑफ युमेन एम्पॉवरमेंट' या स्मारकाची प्रतिकृती उभारावी. त्या संदर्भात चंद्रकांत तागड मो. नं. ९४२२२२१५३२ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

उत्कृष्ट देखाव्य स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम क्रमांक रु.१० हजार व ट्रॉफी, द्वितीय क्रमांक रु. ७ हजार व ट्रॉफी, तृतीय क्रमांक रु. ५ हजार व ट्रॉफी. तसेच दोन उत्तेजनार्थ रु. २५०० चे पारितोषिके देण्यात येणार आहेत. अधिक माहिती जाणे सहभागासाठी अनिल मोहिते मो. नं. ९४२२६१६२१० व अशोकराव गायकवाड मो. नं. ९८५०००४४६२ यांच्याशी संपर्क साधावा.

आयकॉन पब्लिक स्कूलमध्ये बाल सुरक्षा आणि कायदेशीर बाबींवर आयोजित विशेष कार्यशाळेत मार्गदर्शन करताना महिला पोलिस अधिकारी प्रियांका आठरे व ॲड.प्रिया खेडकर. समोर उपस्थित विद्यार्थी वर्ग.

बाल सुरक्षा आणि कायदेशीर बाबींवर 'आयकॉन स्कूल'मध्ये विशेष कार्यशाळा

नगर – शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि बालकांना संरक्षण देणारे विविध कायदे याविषयावर आयकॉन पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थी व पालकांसाठी विशेष कार्यशाळा घेण्यात आली. इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत विद्यार्थी तसेच त्यांचे पालक यात सहभागी झाले होते. कोतवाली पोलिस ठाण्यात नियुक्त महिला अधिकारी प्रियांका आठरे तसेच ज्ञिल्हा महिला समितीच्या सल्लागार सदस्या ॲड. प्रिया खेडकर यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले.

प्रियांका आठरे यांनी मुलांची शाळेतील सुरक्षितिता कशी निश्चित करावी, शाळेच्या परिसरातील विविध चुकीच्या गोष्टींना आळा बसवणे, शाळा व्यवस्थापन व पालकांमधील नित्य संवाद याबाबत मार्गदर्शन करताना पोलिस दलात काम करताना आलेले अनुभव सांगितले.

सायबर लॉमध्ये तज्ज्ञ असलेल्या ॲड. प्रिया खेडकर यांनी मुलांच्या सुरक्षेशी संबंधित विविध कायदेशीर तरतुदींची माहिती देताना इंटरनेट, मोबाईलसारख्ये तंत्रज्ञान सावधपूर्वक हाताळण्याचे आवाहन केले. घर, शाळा आणि सार्वजनिक ठिकाणी मुलांचे रक्षण करण्यासाठी कोणती काळजी घ्यावी याबाबतही सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. सत्राच्या शेवटी संस्थेचे संचालक कर्नल आर.सी. राणा, श्रीमती आराधना राणा, मुख्याध्यापिका दीपिका नगरवाला यांनी पाहुण्यांचा सत्कार केला. या माहितीपूर्ण सत्रात मुलांच्या सुरक्षेसाठी सहयोगी दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित केले केले. आमचे विद्यार्थी संरक्षित आहेत आणि त्यांना तोंड द्यायचा लागणाऱ्या कोणत्याही आव्हानांसाठी ते तयार आहेत, असा संदेश शाळेने या कार्यक्रमातून दिले.

वायसीएमच्या सर्व प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ

नगर – यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अंतर्गत अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार कृषी शिक्षणक्रम, बी.एड, बी.एड. (विशेष) इत्यादी शिक्षणक्रमां व्यतिरिक्त उर्वरित सर्व शिक्षणक्रमांची सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षाच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेस मुदत वाढ देण्यात येत आहे. मुक्त विद्यापीठाद्वारे घेण्यात येणाऱ्या योग शिक्षक पदविका (झ१२६) अभ्यास क्रमाची २०२४–२५ या वर्षाकरिता प्रवेश प्रक्रिया मुदत वाढविण्यात आली असून विनाविलंब ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यास १५ सप्टेंबर पर्यंत प्रवेश घेता येतील असे अभ्यासक्रमाचे समन्वयक शर्वरी वेशीकर यांनी सांगितले.

या अभ्यासक्रमास युजीसी मान्यता असल्यामुळे ज्या साधकास योगामध्ये आपले करियर करावयाचे आहे, त्यांनी ह्या परीक्षेचा भरपूर फायदा होईल. तसेच कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक नागपूर यांचा एम.ए. (योग) हा अभ्यासक्रम करता येतो.

या अभ्यासक्रमास योग विद्या गुरुकुल नाशिक अंतर्गत योग महाविद्यालयात नाशिक यांना मान्यता मिळाली आहे.

त्यामुळे विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर आपला प्रवेश निश्चित करण्यासाठी ९४०५०००६८०, ९८२३७८१२४६, ९४२३६७६०५९ या क्रमांकावर संपर्क करावा.



हाजी शौकत तांबोळी यांनी अहमदनगर शहर २२५ विधानसभा मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष किसनराव लोटके व कार्यालयीन प्रमुख अमोल जाधव यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी रोहिदास कर्डिले, अल्पसंख्यांक जिल्हा अध्यक्ष खान, सय्यद खलील, समीर पठाण, अनंतराव गारदे, फारूक रंगरेज, फयाज तांबोळी, जीशान खान, निसार बागवान, फरान रंगरेज आदी.

विधानसभेच्या उमेदवारीसाठी हाजी शौकत तांबोळी यांचा 'राष्ट्रवादी'कडे अर्ज दाखल

नगर – येथील तंबोली हज टूर्सचे संचालक हाजी शौकत तांबोली यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडे अहमदनगर शहरातून उमेदवारी मागितली आहे.

राष्ट्रवादी भवन येथे अल्पसंख्यांक प्रतिनिधी म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राज्याचे उपाध्यक्ष हाजी शौकत तांबोली यांनी अहमदनगर शहर २२५ विधानसभा मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष किसनराव लोटके सर व कार्यालयीन प्रमुख अमोल जाधव यांच्याकडे सुपूर्द केला.

यावेळी नगर तालुका अध्यक्ष रोहिदास कर्डिले, अल्पसंख्यांक जिल्हा अध्यक्ष अथर खान, सय्यद खलील, अल्पसंख्यांक उपाध्यक्ष समीर पठाण, व्यापारी व उद्योग सेलचे अध्यक्ष अनंतराव गारदे, प्रदेश सचिव फारूक रंगरेज, फयाज तांबोळी, जीशान खान, निसार बागवान, फरान रंगरेज आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी हाजी शौकत तांबोळी म्हणाले की, २२५ अहमदनगर शहर विधानसभेया जागेसाठी उमेदवारी मागितली असून अहमदनगर जिल्ह्यासह, संपूर्ण महाराष्ट्रातील हिंदू मुस्लिम ओबीसी समाजाचे तसेच बहुजन समाजाचे अनेक प्रश्न सोडवलेले आहेत व पक्षाच्या स्थापनेपासून काम करत असून सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक कार्यात अग्रस्थानी असतात तसेच संपूर्ण जिल्हाभर व जिल्ह्याच्या बाहेर देखील जनसंपर्क दांडगा असुन अनेक संघटनांनी व समाजाने अहमदनगर शहर विधानसभा लढवण्यासाठी विनंती केल्याने हा उमेदवारी अर्ज दाखल केला असल्याची भावना हाजी शौकत तांबोली यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर ई-निविदा सुचना क्र. ११ सन २०२४-२०२५ (दुबार निविदा)

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य त्या वगीतील नोंदणी संकाटदारांकडून खालील कामांकरिता ब-१ मनुष्यलीन निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविले आहेत. निविदा जागरूक शासन धोरणस्वरूपात https://mahatenders.gov.in वेबसाइट डाऊनलोड करण्यात यावी. सर्वच निविदा सिंकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा सिकारली जाणार नाही.

अ.क्र	कामाचे नाव	कामाची अंदाजित किंमत रुपये	बयाना रक्कम	निविदा घेंतलेली फी रुपये	नोंदणी वर्ग	काम पूर्ण करण्याचा कालावधी
१	रुपया २२२ तोलारविहिर सावरचोळ कोठुळ संगमनेर कळेगांव कोपरगांव पळेगाव उक्कडगांव वेनापूर रुपया (रुपा ६५) किंमी ८६/००० ते १२६/०० मी वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे सा. कोपरगाव, जि. अहमदनगर	२३३२६६	२३०००	५५०	वर्ग- V.A व त्यावरील	१२ महिने (पावसाळ्यासह)
२	जिल्हा हद्द देवगाव अकोले सुगांव मार्ग आंबी ते रुपया- ५० रुपा (रुपा-३३) कि.मी. १८/३०० ते ४६/००, मी वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे सा. अकोले,	१५८३४३२	१६०००	५५०	वर्ग- V.A व त्यावरील	१२ महिने (पावसाळ्यासह)
३	जिल्हा हद्द ते बारी राजुर कोकुळ ब्राह्मणवाडा बोटा रुपा (रुपा-२३) कि.मी. २६४/०१० ते ३८१/५० मी वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे सा. अकोले, जि-अहमदनगर.	१५१४०१	१००००	५५०	वर्ग- VII व त्यावरील	१२ महिने (पावसाळ्यासह)
४	अकोले टाकळी तरकळेल रुपया (प्रविमा. १८) कि.मी. २४/०० ते ४१/००० मध्ये मी वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे सा. अकोले, जि.अहमदनगर.	२०१९५६६	२१०००	५५०	वर्ग- V.A व त्यावरील	१२ महिने (पावसाळ्यासह)
५	रुपया. ६० वेदगाव्हुरी पिंपळगावपाळा जवळेकळंबर रुपा (प्रविमा – २२) कि.मी ०/०० ते ३४/८० मी वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे सा. संगमनेर, जि. अहमदनगर	१७५०१७७	१८०००	५५०	वर्ग- V.A व त्यावरील	१२ महिने (पावसाळ्यासह)
६	राजुर जांबुत नॉटुरवेवाघाळ रुपया ५० ते रुपया ७०ते रुपा (प्रविमा-२३) कि.मी. १८/०० ते ३३/०० मी वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे सा. संगमनेर, जि. अहमदनगर	२०८१३१६	२१०००	५५०	वर्ग- V.A व त्यावरील	१२ महिने (पावसाळ्यासह)
७	अ) मुसाळने अकोले गर्दनी इगुरेवी घोटवी ते रुपा- ४४ (प्रविमा- ७६) कि.मी. ०/०० ते १५/००० मी वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे सा. अकोले, जि.अहमदनगर. ब) खंदरमाळ ते वेडेवाडी बभानवाडी पळस (प्रविमा – २५) रुपा कि.मी. ०/०० ते २०/४०० मी वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे सा. संगमनेर, जि. अहमदनगर	१०३१६६१	११०००	५५०	वर्ग- VI व त्यावरील	१२ महिने (पावसाळ्यासह)
८	अ) जिल्हा हद्द घाटघर सेंडी राजुर अकोले संगमनेर लोणी श्रीरामपुर नेवासा रुपा (रुपा-५०) कि.मी. ३०/८०० ते ५५/५०० मी वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे सा. अकोले, जि. अहमदनगर. ब) जिल्हा हद्द मार्ग बावी राजुर आगरवाडी कोठुळ ब्राह्मणवाडा बोटा रुपा (रुपा-२३) कि.मी. २०५/३०० ते २४८/८०० मी वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे सा. अकोले, जि- अहमदनगर.	२४३३३६१	२५०००	५५०	वर्ग- V.A व त्यावरील	१२ महिने (पावसाळ्यासह)
९	अ) रा.म.मा.६० ते सन्ने निमोण वेळासने रुपा (प्रविमा- ०५) कि.मी. ०/००० ते ४३/५४० मी वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे सा. संगमनेर, जि. अहमदनगर. ब) जिल्हा हद्द ते हिवरगाव ओंदगाव मिळणी वायविहिरी रुपा (प्रविमा- १६) कि.मी. ४४/५०० ते ५१/३०० मी वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे सा. संगमनेर, जि. अहमदनगर	१७८८९१६	१८०००	५५०	वर्ग- V.A व त्यावरील	१२ महिने (पावसाळ्यासह)
१०	संगमनेर कुरण पारेगाव खु. नायगव कुसळ पारेगाव ढु. ते शिंबर राजुरवाडा हद्द जोडणारा रुपा (प्रविमा-२००) कि.मी. ०/००० ते २२/६०० मी वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे सा. संगमनेर, जि. अहमदनगर	१०९८९३४	११०००	५५०	वर्ग- VI व त्यावरील	१२ महिने (पावसाळ्यासह)
११	अकोले तालुका हद्द बक्नाव लांडगा ते रा.मा. ५० जोडे पांडुरवाळ रा.मा.६५ गांडुरी दुधवा पेनगिरी रुपा (प्रविमा- १९५) कि.मी. ०/००० ते ९९/३०० मी वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे सा. अकोले, जि- अहमदनगर.	१५२२३९९	१६०००	५५०	वर्ग- V.A व त्यावरील	१२ महिने (पावसाळ्यासह)
१२	रा.म. ५० ते समनापुर पोखरी हवेली कळवे जोडे कळंबेवर लोहारे ते आळुगाव हद्द जोडणारा रुपा (प्रविमा-२०१) कि.मी. ०/००० ते २४/६०० मी वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे सा. संगमनेर, जि. अहमदनगर	१२०५६४४	१३०००	५५०	वर्ग- VI व त्यावरील	१२ महिने (पावसाळ्यासह)
१३	राजुर मानिकओझर कुसळी लोभारविहिर ते रुपा-६५ रुपा (प्रविमा-१७) कि.मी. २१/०० ते ३९/६०० मी वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे सा. अकोले, जि-अहमदनगर.	१५२६३५६	१६०००	५५०	वर्ग- V.A व त्यावरील	१२ महिने (पावसाळ्यासह)
१४	शिवार लव्हे चवळेवाडा राजुर संगमनेर लोणी रुपा (प्रविमा-२१) कि.मी. ८/३०० ते ३१/७०० मी वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे सा. संगमनेर, जि. अहमदनगर	१९७३०६२	१२०००	५५०	वर्ग- V.A व त्यावरील	१२ महिने (पावसाळ्यासह)

निविदेचे वेळापत्रक

१	ई-निविदा उपलब्ध कालावधी	:-	दिनांक ०५.०९.२०२४ ते १३.०९.२०२४
२	निविदा उघडणे		दिनांक :- १६.०९.२०२४ कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, संगमनेर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वा.
३	Online निविदेची हार्ड कॉपी दिलबंदी सबंधितास सादर करण्याचा दि.		कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, संगमनेर यांचे कार्यालयात दि. १७.०९.२०२४ पेक्षी १७.०० पर्यंत विहित स्वरुपातील

निविदा/नाशिक/जाहिरात/ २५०/२०२४

अधिकार निविदा सुचना व निविदेकरावणी द्वारा नाहीशी खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे. The Details of works Provided in the websites as below.
1. www.maharpwd.com 2. https://mahatenders.gov.in
५. सदर कामाच्या वर्ग किंवा एक निविदा कोणतीही कारण न देता रद्द करण्याचा/ वे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

मुख्यअभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर

जाहीर नोटीस

नगरमध्ये लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की खालील परिक्षिप्तामधे नमूद केलेली मिळकतीचे मूळ मालक नाने जयसिंग जयराम बोरकर यांनी सदर मिळकतीचे साठेबाज आणखे आजिंस नाने अमित शहुल यामनारे यांचे इक्वाल दि.१७/०१/२०१९ रोजी साठेबाज दस्त क्र. ६०/२०१९ अन्वये विक्रुत नोंदणुन दिलेले आहे. सदर साठेबाजानचे मूळ मालक जयसिंग जयराम बोरकर यांनी आपचे आजिलांकडून गोठवा प्रमाणात रक्कम स्विकारलेली आहे. जयसिंग जयराम बोरकर यांच्या मृत्यूनंतर त्यांचे वारस सदर मिळकतीचा वेकायदेशीर व्यवहार आपचे आजिलांचया परवरार करीत असल्याबाबत आपचे आजिलांनं खात्रीदायक समजलेले आहे. त्यामुळे सदर मिळकतीचे मूळ मालक जयसिंग जयराम बोरकर यांनी सदरची मिळकत ही आपचे आजिलांच्या हक्कात दि.१७/०१/२०१९ रोजी साठेबाज दस्त क्र.६०/२०१९ अन्वये विक्रुत नोंदणुन दिली आहे व सेखानापासुन सदर मिळकतीचचे आपचे आजिलांचा हक्क व अधिकार प्राप्तात्तीत झालेला आहे. त्यामुळे कोणीही कोणत्याही प्रकारे सदर मिळकतीबाबत कोणताही व्यवहार करू नये, सदरचा व्यवहार हा वेकायदेशीर ठरनार असुन तो आपचे आजिलांचर वंचनाकरा पहाडार नाही. कोणाचीही कोणत्याही प्रकारची चवाकरुण अगर फसवा होई नये म्हनुन सदरची जाहिर नोटीस प्रसिध्द केली आहे.

परिक्षिप्त

मिळकतीचे वर्णन :- हि.१. आहमदनगर सब हि.१. तालुका नगर पैकी अहमदनगर महानगपालिका हद्दीतील मौजे सावेडी येथील सर्व्हे नं. ५७/२ नमील बिनशेती प्लॉट नं. ३९ चे क्षेत्र ३७०.०० चौ.मी. हा संपुर्ण प्लॉट व त्यावरील असलेले सुपर्ण बांधकाम क्षेत्र

चांर्ही चतुर्दिस्त :

पुर्वेस – प्लॉट नं.४०, दक्षिणेस – जुना सर्व्हे नं. ८३,
पश्चिमेस – रोड, उत्तरेस – रोड,

वेगेळ्यानचे चतुर्दिशा पुर्वक वरोक्त तरंगपुत वस्तु व वानगुबीचे, बहिशादीचे तसेच इतर सर्व हक्क व अधिकार तसेच सोबी सुविधासह काही एक राखुन न ठेवता.

वेगेळ्यानचे जाहिर नोटीस दिली असे.

दिनांक :- ०५/०९/२०२४

अहमदनगर

ॲड. राजु नारकर नाही
ऑफिस नं. १, निर्मल टॉवर, स्वामी विवेकानंद पुतळ्याजेळारी, सावेडीचा, अहमदनगर

"हर काम देश के नाम"

अहमदनगर छावनी परिषद

एएमएक्स वॉच, क्रेमा पिंगार, अहमदनगर – ४१४००२

Email : ahmedngrcantt@gmail.com Website: ahmednagar.cantt.gov.in

पत्र सं.आहा/राजस्व/ई-छावणी/२०२४-२५ दिनांक : ३०/०८/२०२४

जाहिर नोटीस

संदर्भ– दैनिक नवा मराठा व लोकमत वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेली दिनांक २७/०६/२०२४ रोजीची जाहीर नोटीस.

छावणी क्षेत्रामधील सर्व नागरिकांना कळविण्यात येते कि धरपट्टी बिल व पाणीपट्टीचे बिल हे ऑनलाईन **achhawani.gov.in/citizen** या वेबसाईट वर आलेले असून सर्व नागरिकांनी ते दिनांक ३०/०६/२०२४ या तारखेच्या आत ऑनलाईन पद्धतीने भरावे असे वरील संदर्भात जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात आले होते. तरी, ज्यां धारकांनी बिल ३०/०६/२०२४ पर्यंत भरलेले नाही. त्यांना दिनांक ०९/०७/२०२४ पासून दंड रक्कमेवर रु. १००/– नोटीस फी आकारण्यात आलेली आहे व ०९/०९/२०२४ पासून देय रक्कमेवर प्रतिमाह १% व्याज आकारण्यात येणार असून कलम ३२४ अन्वये मा. न्यायालयात दावा दाखल करुन वसुलीसाठी मालमत्ताधारकांना वकिला मार्फत नोटीस देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तरी सर्व मालमत्ताधारकांना आव्हान करण्यात येते की, धरपट्टी व पाणीपट्टी ऑनलाइन पद्धतीने भरुन प्रशासनास सहकार्य करावे व संभाव्य कार्यवाईचा बडगा टाळावा.

विक्रांत मोरे
मुख्य कार्यकारी अधिकारी
छावनी परिषद अहमदनगर

महाराष्ट्र नवनिर्माण सेनाचे अमित ठाकरे यांना राजयोगाची पुस्तके देण्यात आली भेट

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या द्वारे जगभरात १४३ देशात विकसित जागाच्या भारताच्या प्राचीन राजयोगाची पुस्तके व सुविचारांची प्रेम महाराष्ट्र नवनिर्माण सेना (एमएनएस) चे अमित ठाकरे यांना ब्रह्माकुमारी सुशमा दीदी यांच्या हस्ते भेट देण्यात आली. यावेळी ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके व मनसेचे नेते सुमित वर्मा आदी.

जाहीर नोटीस

दि. ०५/०९/२०२४

नगरमध्ये लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्ट मध्ये वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीच्या त्रिक्षिप्त व्यवहार आपचे आजिलांकडोन उपलब्ध आहे. सदर व्यवहारापोटी आपचे आजिलांनी विश्वास राखून रक्कम दिलेली आहे. सदर प्लॉट मिळकत, आपचे आजिलांकडे असुन आहे, असे विश्वास मालकांचे म्हणणे आहे, परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर प्लॉटवरचा कोणताही चालु वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षिसपत्र, अथवा जप्ती, बँक बोजा, पोटकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकुम, स्थगिती, घोटणी, चार्ज, लीज, इनमेंट, अगर इतर कोणताही चालु वाद असल्यास संबंधितांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर सबळ पुराव्यासह लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या समयप्रसंगा प्रमाणित नकलांसह आमुचा सळळाने व आमची खाती करून घायी, विहित मुदतीत कोणाचीही, कोणतीही हरकत न आल्यास, त्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजून आमचे आशिल करेदीर व्यवहार पूर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट मिळकत वर्णन :- जिल्हा अहमदनगर गाव तुकडी तालुका अहमदनगर पैकी, अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सह. दुय्यम निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे केडगाव येथील औद्योगिक विभागेतो प्लॉट मिळकतीचे वर्णन खालीप्रमाणे :–

स.नं./ग.क्र.	प्लॉट नं.	क्षेत्रफळ
७०	७/१	५१९.५० चौ.मी.

याचा संगणकीय उतारापाप्रमणे सद्द क्रमांक व उपविभाग ७०/प्लॉट नं ७/१ चे क्षेत्रफळ ५.१९.५० आर.चौ.मी. हा संपुर्ण प्लॉट.

चांही चतुर्दिस्त खालीप्रमाणे :–

पुर्वेस : १८.८८ मिटर रुंदीचा डी. पी. रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं. ७/२,
पश्चिमेस : प्लॉट नं. ८, उत्तरेस : ५५ मिटर रुंदीचा रस्ता.

सदर मिळकतीचे विक्रमान मालक –
कायनेटीक इंजिनीअरिंग मिल कंपनी
मॅनेजींग डायरेक्टर ऋण हरगोबिन फिरोदिया,
रा. अहमदनगर

ॲड. शामसुंदर हि. गुप्ता
ऑफिस : शॉप नं. ९, पुजा अपार्टमेंट सहकार सभागृह रोड, अहमदनगर. मो.नं. ९४२३७५२९२२

धम्माल मनोरंजन

सुविचार

अपयशाच्या कठीण खडकाखालीच यशाच्या पाण्याचा झरा असतो.

तात्पर्य : महान यश प्राप्त करावयाचे झाल्यास त्यासाठी अनंत परिश्रम करावे लागतात. काही वेळेला सुरुवातीस त्यात अपयशही येते. पण त्यामुळे निराश न होता प्रयत्नांची पराकाष्ठा करीत राहिल्यास ते महान यश निश्चितच आपणास मिळते, म्हणून अपयशाने ते कार्य सोडू नका, पुन्हा प्रयत्नात लागा.

आशा ही कमळाच्या पाकळीवरील दवबिंदूप्रमाणे आहे.

तात्पर्य : प्रत्येक व्यक्ती विविध प्रकारची आशास्वप्ने बाळगते. त्यापैकी कितीतरी आशा अपूऱ्याच राहतात आणि मग ती व्यक्ती दुःखी होते. यासाठी ध्यानात घ्यावे की, कमळाच्या पाकळीवरील जलबिंदू मोत्याप्रमाणे दिसतात, पण ते मोती नसतात. त्याघ्रप्रमाणे आशेचे असते. म्हणून फार आशा मनाशी बाळगू नयेत आणि त्या आशा पुऱ्या झाल्या नाहीत, तर त्याचे मनाला फार दुःख होऊ देऊ नये.

दिनविशेष ०६सप्टेंबर २०२४

१७६६: जॉन डाल्टन – इंग्लिश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: २७ जुलै १८४४)

१८८९: बॅ. शरदचंद्र बोस – स्वांत्र्यसेनानी, झुंजार पत्रकार, नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे वडील बंधू (मृत्यू, २० फेब्रुवारी १९५०)

१८९२: नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ सर एडवर्ड ॲपलटन यांचा जन्म.

१९०१: कमलाबाई कामत तथा कमलाबाई रघुनाथ गोखले – भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिल्या स्त्री कलाकार. 'राजा हरिश्चंद्र' या पहिल्या मूकपटात त्यांनी भूमिका केली होती. त्यांचे चिरंजीव चंद्रकांत गोखले व नातू विक्रम गोखले अशा तीन पिढ्यांनी अभिनय क्षेत्र गाजवले. (मृत्यू: १८ मे १९९७)

१९२१: बार–कोड चे सहसंशोधक नॉर्मन जोसेफ व्हाउडलँड यांचा जन्म. (मृत्यू: २ सप्टेंबर २०१२)

कमलाबाई कामत तथा कमलाबाई रघुनाथ गोखले – भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिल्या स्त्री कलाकार.

१९२३: युगोस्लाव्हियाचे राजा पीटर (दुसरा) यांचा जन्म.

१९२९: यश जोहर – हिन्दी चित्रपट निर्माता (मृत्यू: २६ जून २००४)

१९५७: पोर्तुगालचे पंतप्रधान जोशे सॉक्रेटिस यांचा जन्म.

१९६८: सईद अन्वर –पाकिस्तानी क्रांबखुश फलंदाज व कप्तान. आपल्या पदार्पणाच्या कसोटी सामन्यात तो दोन्ही डावांत शून्य धावांवर बाद झाला होता. आपल्या पहिल्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यातही त्याने केवळ ३ धावा केल्या होत्या. मात्र नंतर त्याची कामगिरी एकदमच बहारदार झाली. एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांत सलग तीन शतके झळकवणाऱ्या मोजक्या खेळाडूंमध्ये त्याचा समावेश होतो.

१९७१: भारतीय क्रिकेट खेळाडू देवांग गांधी यांचा जन्म.

मृत्यू / पुण्यतिथी / स्मृतिदिन:

१९०७: नोबल पारितोषिक विजेता प्रख्यात फ्रेंच कवी आणि निबंधलेखक सुल्ली प्रुडहोमी(डॅ्रश्रू झॉंविहोशा). यांचे निधन.

१९३८: नोबेल पारितोषिक विजेते फ्रेंच लेखक सली प्रुडहॉम यांचे निधन.

१९६३: गंजेबर गोविंद पै तथा राष्ट्रकवी गोविंद पै – कन्नड कवी व श्रेष्ठ भाषा संशोधक, इतिहास व तत्त्वज्ञानाचे व्यासंगी, त्यांना कन्नड, कॉकणी, इंग्लिश, तुळू, संस्कृत, तेलुगू, तामिळ, मराठी, कन्नड, बंगाली, पर्शियन, पाली, उर्दू, ग्रीक, जपानी इ. २५ भाषा अस्खलित येत असत. त्यांनी अनेक जपानी ग्रंथांचे कन्नडमध्ये भाषांतर केले. (जन्म: २३ मार्च १८८३)

१९७२: अह्लाउद्दीन खाँ – सरोदवादक व संगीतकार. हिन्दुस्थानी शास्त्रीय संगीताचीन महर्षीतुल्य कलाकार व संगीतकार. सरोद, व्हायोलिन, बासरी व अन्य अनेक वाद्ये त तयारीने वाजवत असत. मैहर राजघराण्याचे दरबारी वादक. संगीत नाटक अकादमी पारितोषिक (१९५५), पद्मभूषण (१९५८), पद्मविभूषण (१९७१) इ. अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. (जन्म: ? ? १८६२)

१९८६: सुरेश हरिप्रसाद जोशी – आधुनिक गुजराथीतील प्रसिद्ध कवी, कथाकार व समीक्षक. त्यांनी काही भारतीय व परकीय साहित्यकृतींचे गुजराथीत अनुवादही केले.

(जन्म: ३० मे १९२१)

१९९०: सर लिओनार्ड तथा 'लेन' हटन – इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: २३ जून १९१६)

२००७: इटालियन ऑपेरा गायक लुसियानो पाव्हारॉटी यांचे निधन.

२००९: प्रसिद्ध भारतीय राजकारणी व पंजाब राज्याचे माजी तेराव्ये मुख्यमंत्री हरचरण सिंह ब्रार यांचे निधन.

टिप्स

✔ **आफ्टर शेव्ह लोशनचे काही थेंब टाकून बूट साफ केल्यास त्यावरील चिकट धूळ निघण्यास मदत होते.**

✔ **चांदीची भांडी सुरक्या राखने किंवा साध्या मिठाने पुसून काढा. चमकदार होतील. तसंच चांदीची भाडी अर्धा तास चिंचेच्या पाण्यात ठेवून मग साध्या पाण्याने धुतल्यानेही भांडी चमकदार होतात.**

✔ **आंघोळ या शद्बाचा अर्थ फक्त साबण लावून पाणी ओतणे हा नसून यात संपूर्ण शरीराची स्वच्छता होणे अपेक्षित आहे. सौंदर्यशास्त्राच्या दृष्टीने अतिशय गरम किंवा अगदीच थंड पाण्याने आंघोळ करणे चुकीचे आहे. थंड पाण्याने त्वचा कोरडी होते. तर**

विरंगुळा

पढतः बाजुला दिलेल्या असंबद्ध शब्दामधून एक अर्थपूर्ण शब्द तयार होतो तो चौकटीत लिहा व ☐☐☐☐ मध्ये लिहिल्या गेलेल्या शब्दातून एक शब्द तयार होतो त्या शब्दाच्या सहाय्याने दिलेले अर्धवट वाक्य पूर्ण करा.

ई ड ा ु ल ब ा

द अं े ा ब ी व

ब ु ा ग ा भ ई

च य ल ि ा व ी

☐☐☐☐ **फळे येणार नाहीत व अंजिराला फुले येणार नाहीत. म्हणून त्यांचे आहेत ते गुण कमी महत्त्वाचे नसतात.**

रा	जे	शा	ही
रु	प	व	ती

क	र	को	धा
पा	ण	बु	डी

मागील उत्तर : कोणतीही

शब्दरंजन



आडवे संकेत

१) कष्ट, धडपड
४) प्रत्यक्ष कृती न करता कागदावर लिहिणे
१०) आईचे वडील
१२) पुढे आलेली टेकडी
१३) दयाळू
१४) संपूर्ण
१६) आरती
१७) पक्के, निश्चित
१८) गोंधळ
२०) शेळीचे वेस्त
२१) मुंडक्यावाचून शरीर
२५) दहा वेळा शंभर
२७) एक गायक
२८) देश
२९) राहणे
३०) दहा
३१) जोधळ्यावरील एक रोग
३३) मोठा
३४) सार्वजनिक मार्ग
३६) फार गोरा
३८) लहान पिल्लू
४०) डोळ्यातील बाहुली
४२) आज्ञापत्र
४५) शंकर
४६) पर्जन्यकाळ
४८) दगयंती
४९) धूपाने ओवाळण्याची आरती
५०) सुसर

उभे संकेत

१) खूप, अपराध
२) खेप, त्रास
३) संयोग, एकोपा
५) गरीबांचे वाली
६) पाणी तापविण्याचे जुने साधन, भांडे.
७) एक आडनाव
८) एक पक्षी
९) न्यायव्या
११) आणखी, हि
१४) लढाई
१५) धमधमा असा आवाज
१८) धाक दाखविणे
१९) सावकाशपणे जी गोष्ट साध्य व्हायची तिच्या संबंधात उतावळेपणा करुन लागलीच फळाची अपेक्षा करणे म्हणजे मुर्खपणा
२२) आरोळी
२३) एक प्रसिद्ध गायक
२४) पराकाष्ठा
२६) एक जात
३२) वडील
३३) नम्र
३५) धव धेणारी जिभ
३७) विड्याचा तबक
३८) एक संख्या
३९) दिसायला सुंदर
४१) नवीन
४३) पृथ्वी
४४) खस
४६) झाडामोवतालचा ओटा
४७) चाक

कालचे उत्तर

ख	जी	न	दा	र		अ	घ	रं	पा	र		द
र	ब	र	ब			न				ख	ब	र
ज	न	म	ल		स	मो	रा	स	मो	र		डा
		ग		को	म	ल			रा	खी		व
स	म	र	स		ज			सु	र	त	फे	णी
मा	ल	म	त्ता		दा	ख	ला		जी		त	
ज	म		हि	व	र		प	र	डे	सी		
से		ट	का	से		का	शी		सा	ता	रा	
बा	ट	मा	री		घा	र		बा	र्ड	फ		घा
	क	ट		व	र	ण	भा	ल		ळ		ग
स	म	र	स		क		ऊ	ब	की		गि	रा
म	का		ता	स		प	रा	क्र	म		रि	
ई		आ	र	ती		सा	ब		या	त	जा	त

१) महसूल खात्याचे प्रामस्तरावरील दफ्तर कोण सांभाळतो?
अ)सरपंच ब)उपसरपंच क)तलाठी ड)ग्रामसेवक

२) मुलकी प्रशासनातील शेवटची यंत्रणा कोणती?
अ)तहसीलदार ब)पोलिस पाटील क)सरपंच ड)तलाठी

३) जिल्हा परिषदेमध्ये महिलासांठी किती टक्के जागा राखीव असते?
अ)१२ टक्के ब)२५ टक्के क)३३ टक्के ड)३० टक्के

४) वंशपरंपरेने मिळणारे पाटील पद ही पदवी कोणत्या वर्षी रद्द करण्यात आली? अ)१९५५ ब)१९६३ क)१९६२ ड)१९५९

५) पंचायतराज पद्धतीची द्विस्तरीय योजना कोणत्या राज्याने स्वीकारली?
अ)मध्य प्रदेश ब)आंध्रप्रदेश क)महाराष्ट्र ड)तामिळनाडू

६) ग्रामपंचायतीला अर्थपुरवठा कोण करतो?
अ)कर रुपाने ग्रामस्थ ब)राज्यसरकार क)केंद्र सरकार ड)जि. परिषद

७) पुलिस पाटलाची रजा मंजूर करण्याचे अधिकार कोणास आहेत?
अ)सरपंच ब)तहसिलदार क)उपसरपंच ड)तलाठी

८) पोलिस पाटलाची नेमणूक करण्याचा अधिकार कोणास आहे?
अ)जिल्हाधिकारी ब)प्रांतऑफिसर क)उपजिल्हाधिकारी ड)सीईओ

९) देशातील पहिले महिला पोलिस पथक कोठे स्थापन झाले?
अ)दिल्ली ब)मद्रास क)मुंबई ड)कलकत्ता

१०) गावचा नमुना सात व नमुना बारा कोणाशी संबंधित आहे ?
अ)सरंपच ब)जिल्हाधिकारी क)तलाठी ड)उपसरपंच

११) कर्नल वायलीच्या हत्येबद्दल कोणाला फाशीची शिक्षा ठोठावली?
अ)स्वा. सावरकर ब)बीना दास क)सुर्यसेन ड)मदनलाल धिंग्रा

१२) महात्मा गांधी राजकीय गुरु कोणाला मानत असत?
अ)न्या. रानडे ब)पं. नेहरु क)गो. कृ. गोखले ड)लो. टिळक

१३) महात्मा गांधीची बॅरिस्टर ही पदवी केव्हा काढून घेण्यात आली?
अ)१९२१ ब)१९२३ क)१९९९ ड)१९२२

१४) कूका आंदोलन कोठे घडून आले होते?
अ)मद्रास ब)पंजाब क)हरियाणा ड)बंगाल

१५) हिंद स्वराज नावाचे पुस्तक कोणी लिहिले होते?
अ)बलिमचंद्र चटर्जी ब)म. गांधी क)लो. टिळकड)डॉ. राजेंद्र प्रसाद

१६) यंग बंगालचे संस्थापक कोण होते?
अ)बं. चटर्जी ब)अरविंद घोष क)सु. बोस ड)लो. टिळक

१७) १९२९ मध्ये केंद्रीय कायदे मंडळात बॉंब फेकणारा भगतसिंगचा सहकारी कोण?अ)तास्कानाथ दत्त ब)बटुकेश्वर दत्त क)चंद्रशेखर ड)मदनलाल धिंग्रा

१८) चले जाव किंवा भारत छोडो हा प्रस्ताव कॉंग्रेसने केव्हा मंजुर केला? अ)८ ऑ. १९४२ ब)१ मे १९४३ क)१५ ऑगस्ट १९४३ ड)९ डिसेंबर १९४४

१९) राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेच्या वेळी एकूण किती सदस्य उपस्थित होते? अ)६० ब)७२ क)८५ ड)९०

२०) असहकार आंदोलनात हिंसाचारामुळे प्रसिद्धीस आलेले चौरी चौरा हे ठिकाण कोणत्या राज्यात आहे?
अ)पंजाब ब)महाराष्ट्र क)उत्तर प्रदेश ड)केरळ

२१) प्रॉव्हर्टी ॲण्ड अन्– ब्रिटीश स्कूल इन इंडिया हे पुस्तक कोणी लिहिले? अ)विठ्ठल वाळ्केकर ब)दादाभाई नौरोजी क)दीना दास ड)गो.कृ. गोखले

२२) सायमन कमिशन भारतात केव्हा आले?
अ)१९२० ब)१९२२ क)१९२८ ड)१९३१

२३) लाला हरदयाळ यांनी अमेरिकेत गदर पार्टीची स्थापना केव्हा केली? अ)१९१९ ब)१९११ क)१९१० ड)१९१२

२४) मुस्लीम लिगची स्थापनेवेळी भारताचा व्हाईस राय कोण होता?
अ)लॉर्ड मिटों ब)लॉर्ड मॉन्टेग्यू क)लॉर्ड ब्रयू ड)लॉर्ड स्टनले

२५) गिळीच्या उठावकर्त्यांचा कैवार घेणारे हिंदू पेंट्रीआट हे वृत्तपत्र कोणाचे?अ)हरिश्चंद्र मुखर्जी ब)बिनादास क)विष्णूविश्वासड)गांधी

२६) ब्रन्देश भारतापासून केव्हा वेगळा झाला?
अ)१९३७ ब)१९२२ क)१९४२ड)१९५०

२७) भारतातील पहिले वृत्तपत्र र बेंगॉल गॅझेट कोणाच्या कारकिर्दीत सुरु झाले? अ)वॉर हेस्टींग्ज ब)लॉर्ड कॅनिंग क)लॉर्ड डफरिन ड)लॉर्ड कॉर्नावालिस

२८) मोगल सत्तेचा शेवटचा बादशाह कोण होता?
अ)बहादुर शहा जफर ब)औरंगजेब क)शहा आलम ड)मिझा लोयाशी

२९) पहिला भारत मंत्री होण्याचा मान खालीलपैकी कोणास मिळाला?
अ)लॉर्ड स्टॅनले ब)स्टीन्हस्न क)लॉर्ड मोर्ले ड)लॉर्ड डलहौसी

३०) अभिनव भारत संघटनेची स्थापना कोठे झाली?
अ)उत्तर प्रदेश ब)महाराष्ट्र क)पंजाब ड)हरयाणा

उत्तर: (१–क), (२–ब), (३–क), (४–ब), (५–ड), (६–अ), (७–ब), (८–ब), (९–क), (१०–ब), (११–ड), (१२–क), (१३–अ), (१४–ड), (१५–ब), (१६–अ), (१७–ब), (१८–अ), (१९–ब), (२०–क), (२१–ब), (२२–क), (२३–ब), (२४–अ), (२५–अ), (२६–अ), (२७–अ), (२८–अ), (२९–अ), (३०–ब)

फिल्मीरंजन



आडवे संकेत

१) सन २००३ मध्ये बनलेल्या दन चित्रपटाचा नायक.
६) रजनीकांत आणि सोनू वालीया यांचा चित्रपट.
८) या हिट चित्रपटात ऋषी कपूर, श्रीदेवी आणि अमरीश पुरी होते.
१०) सन १९९७ मध्ये बनलेल्या या चित्रपटात सनी देओल, सुनील शेट्टी, जैकी श्रॉफ,अक्षय खन्ना होते.
१२) बहल (नायक)
१३) और पश्चिम (चित्रपट)
१५) सनी देओल, अनिल कपूर, मिनाक्षी शेषांद्रीचा चित्रपट.
१६) सन १९९९ मध्ये आलेल्या वास्तव या चित्रपटात बबनराव कदम कोण होता.
१७) सन २००२ मध्ये आलेल्या या चित्रपटात विवेक ओबेरॉय आणि मनोज वाजपेयी होते.
१८) मालीनी (नायिका)
१९) बिघाशा (नायीका)
२२) सुश्मिता सेनचा पहिला चित्रपट.
२३) बेदी (नायक)
२४) कलकत्ता (चित्रपट)
२६) निर्देशक महेश भट्टच्या या चित्रपटात जुगल हंसराज आणि मयुरी कांगो होते.
२८) सुनील दत्तचा नायक पुत्र.
३१) रुस्तम (चित्रपट)
३२) सन १९९८ मध्ये निर्माता दिग्दर्शक कीर्ती कुमारच्या या चित्रपटात गोविंदा आणि ममता कुलकर्णी होते.
३३) आग्रा (नायिका)

उभे संकेत

२) मै प्रेम की दिवानी हु या चित्रपटाची नायीका.
३) सन १९९७ मध्ये दिग्दर्शक अजीज मिझांच्या या चित्रपटात शाहरुख खान, जुही चावला आणि आदित्य पांचोली होते.
४) सन २००१ मध्ये अनिल शर्माच्या या चित्रपटात सनी देओल आणि मनिषा पटेल होते.
५) पत्नी और तवायफ (चित्रपट) ७) तहलका या चित्रपटात नसरुद्दीन शाहची नायीका.
८) सन २००१ मध्ये आलेल्या अलबेला या चित्रपटात गोविंदाची नायीका.

मागील फिल्मी उत्तर

म	नो	ज	बा	ज	पे	सी		आ	य	शा	जु	ल्या
नो		ह्नि		य				ज		ही		
ज	मी	न			का	य	दा	बा	न	न		धा
कु		ल	गा	न		म	अ					ह
मा		ली		म			अ	जुं	न	पं	डी	त
र		त	र	डी	ब		म	न				
	अ			न		घ	र				अ	जी	त
त	श	क			श			ह	रा	र	त	
	य		क	धे	घा	गे		ल		मां		श
	घा				अ			घ			ह	त्या
अ	मां	न	त		मे	य	दि	ल	स	न	म	
मा	र		ट	म	र		सा		र		ग	जा
न		आ	प		म	र	ना			सा	ज	न

'सिद्धार्थ वाणी'

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।

आज पर्व पर्युषणचा पाचवा दिवस आहे. ज्या काही चांडाळ चौकोडीवर बोलत होतो, तोच विषय आपण पुढे घेवू या. (चांडाळ चौकोडी) म्हणजेच नकारात्मकता.

* क्रोध, मान, माया, लोभ हे नकारात्मक आहे.
* शांती, नम्रता, सरलता, संतोष हे सकारात्मक आहे.
* क्रोधला सोडले तर शांती मिळते.
* मानला सोडले तर नम्रता मिळते.
* मायाला सोडले तर सरलता मिळते, आणि
* लोभला सोडले तर संतोष मिळतो.

जीवनात सकारात्मक विचार आणले तर शांती मिळते. शांती, नम्रता, सरलता, संतोष तेव्हाच मिळते जेव्हा हे चार नकारात्मक विचार जाईल.

क्रोध आणि शांती एकाच ठिकाणी राहू शकत नाही. जिथे क्रोध नसेल तेथेच शांती असेल. क्रोध आणि अभिमान शांतीसाठी मारक आहे.

बाहुबलीने थोडा अहंकार केला व विचार केला. मी जर संन्यास व्रत घेतले तर माझ्यापेक्षा (९८) लहान भाऊ, ज्यांनी माझ्या आधी संन्यास व्रत स्विकारला आहे त्यांचे पाय मला पडावे लागले. या अभिमानामुळे १२ महिने उभे राहावे लागले, परंतु ज्यावेळेस त्यांना अभिमानाची जाणीव झाली, पश्चात्ताप झाला. या पश्चात्तापानेच बाहुबलीला केवलज्ञान प्राप्त झाले. अनेक वेदनादायक किंवा नकारात्मक भावना, अहंकार, अभिमान, मच्छर, क्रोध, राग, इच्छा, वासना, दोष, द्वेष, संकुचित बुद्धि इत्यादी रागाचे विविध प्रकार आहे. परंतु यामध्ये क्रोध आणि घृणा सर्वात वाईट मानले जाते. कारण ते करणा आणि परोपकाराच्या विकासात सर्वात मोठे अडथळे आहे. राग, द्वेष हे एखाद्या व्यक्तिचे चांगले गुण व मानसिक शांती नष्ट करतात.

* विनम्रतामुळे आपली प्रगती होते. आपल्या नात्यात मधुरता निर्माण होते. नम्रता ही मिठाई गुळासारखी नात्यात मधुरता आणते.
* प्रल्हाद ह्याने सकारात्म विचार न सोडता आपल्या ध्येयाकडे लक्ष केंद्रित करत होता. त्याच्यावर अनेक नकारात्मक अडचणी समोर आल्या, पण त्याच्या विचारात तो आज अजर अमर झाला, त्याला ध्रुवतारा म्हणून ओळखले जाते. **– सौ. सविता चोरडिया**

नगरमधील महिला शेतकऱ्याची डाळिंबे सुविधा केंद्रातून ऑस्ट्रेलियाकडे रवाना

नगर – महाराष्ट्रातील डाळिंबांची चव आता ऑस्ट्रेलियामधील नागरिकांना चाखायला मिळणार आहे. राज्यातून डाळिंबाची पहिली खेप नुकतीच वाशी येथील कृषी पणन मंडळाच्या विकिरण सुविधा केंद्रातून ऑस्ट्रेलियातील मेलबर्नसाठी रवाना झाली आहे. विशेष म्हणजे पहिल्या खेपेतून जाणारी डाळिंबे ही अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील शेतकऱ्याच्या शेतातील आहेत.

डाळिंब उत्पादनात भारत हा जगातील प्रमुख देश आहे, तर महाराष्ट्र हे प्रमुख देशातील प्रमुख डाळिंब उत्पादक राज्य आहे. महाराष्ट्रात डाळिंबाची लागवड प्रामुख्याने सोलापूर, नाशिक, अहमदनगर, सांगली, पुणे, सातारा, धाराशिव या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात केली जाते. तसेच बुलढाणा, जालना, बीड, छत्रपती संभाजीनगर, जळगाव व धुळे जिल्ह्यांमध्येही डाळिंबाचे क्षेत्र वाढत आहे. या क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या परिश्रमांमुळे आणि विकिरण सुविधा केंद्राच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने भारतातील डाळिंबाचे फळ आता ऑस्ट्रेलियन बाजारपेठेत प्रवेश करत आहे.

भारताचा डाळिंब उत्पादनाचा पहिला क्रमांक लागत असून, सन २०२३–२४ मध्ये ७२ हजार मे. टन डाळिंबाची निर्यात झाली आहे. प्रामुख्याने संयुक्त अरब अमिराती, बहारीन, सौदी अरेबिया, श्रीलंका इ. देशांना ही निर्यात केली जाते. तसेच युरोपियन देशांमध्ये इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, नेदरलँड या देशांमधेही डाळिंबाची निर्यात होते. जागतिक बाजारपेठेत भारताव्यतिरिक्त स्पेन व इराण या देशांमध्येच निर्यातक्षम डाळिंब उत्पादित केले जाते. डाळिंब या फळामध्ये विशेष औषधी गुणधर्म असल्याने त्याची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी वाढत आहे.

वरील देशांव्यतिरिक्त अमेरिकादेखील डाळिंबासाठी मोठी बाजारपेठ आहे. सन २०१७ मध्ये अमेरिकन बाजारपेठ भारतीय डाळिंबासाठी खुली झाली. अमेरिका आणि इतर बाजारपेठांनंतर आता ऑस्ट्रेलिया ही आणखी एक महत्त्वाची बाजारपेठ खुली करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत होते. ऑस्ट्रेलियाने २०२० मध्ये भारतातून डाळिंबाच्या निर्यातीसाठी मंजुरी दिली होती. भारताने १४ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित भारत – ऑस्ट्रेलिया द्विपक्षीय योजना तांत्रिक बैठकीत ऑस्ट्रेलियाला निर्यात करणाऱ्या डाळिंब फळांसाठी आंतरराष्ट्रीय कार्य योजना (OWP) आणि मानक (SOP) कार्यपद्धतीवर स्वाक्षरी केली. त्यामध्ये माईट वॉश, सोडीयम हायपोक्लोराईड प्रक्रिया, वॉशिंग–ड्राईंग इ. प्रक्रिया करून ऑस्ट्रेलियाने निश्चित केलेल्या मानांकानुसारच्या बॉक्समध्ये पॅकिंग करुन डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करणे इत्यादी बाबींचा अंतर्भाव आहे.

अहमदनगरमधील महिला शेतकऱ्याची डाळिंबाची पहिली खेप कृषि पणन मंडळाच्या वाशी विकिरण सुविधा केंद्रातून ऑस्ट्रेलियाला रवाना झाली.

वाशी येथील कृषि पणन मंडळाच्या विकिरण सुविधा केंद्रात डाळिंबाच्या विकिरण प्रक्रियेच्या चाचण्या कार्यकारी संचालक संजय कदम यांच्या मार्गदर्शनाने व कृषि पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या पाठपुराव्यामुळे यशस्वीपणे पूर्ण करण्यात आल्या. या चाचण्यांची माहिती एन.पी.पी.ओ. यंत्रणेमार्फत ऑस्ट्रेलियन उद्यानुकांना सादर करण्यात आली. कृषि पणन मंडळाच्या विकीरण सुविधा केंद्रावरील यशस्वी चाचण्यांमुळे सदर सुविधा केंद्र ऑस्ट्रेलियन यंत्रणेमार्फत व भारतीय एन.पी.पी.ओ.मार्फत प्रमाणित करण्यात आले. ऑस्ट्रेलिया येथे डाळिंब निर्यातीकरिता कृषि पणन मंडळाची वाशी येथील विकीरण सुविधा ही देशातील एकमेव प्रमाणीत सुविधा आहे. या सुविधेवरुन अपेडा, भारत सरकार, एन.पी.पी.ओ., महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ व के. बी. एक्सपोर्ट यांच्या संयुक्त विद्यमाने ऑस्ट्रेलियास डाळिंब निर्यातीचे नियोजन करण्यात आले.

या सुविधा केंद्रावरुनच पहिली खेप पाठविण्यासाठी अहमदनगर जिल्ह्यातील प्रगतीशील महिला शेतकरी कल्पा खक्कर यांच्या बागेमधील डाळिंबाची निवड करण्यात आली. अपेडाच्या सहकार्याने मे. के. बी. एक्सपोर्ट यांनी ऑस्ट्रेलियामध्ये ही पहिली खेप (कन्साईनमेंट) पाठविण्यासाठी पुढाकार घेतला. डाळिंब कंटेनरसाठी के.बी. एक्सपोर्ट यांच्या पॅकहाऊसमध्ये डाळिंबाची प्रतवारी करुन त्यावर निश्चित केलेल्या प्रणालीनुसार प्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर हे डाळिंब ४ किलोच्या बॉक्समध्ये भरुन त्यावर विकिरण सुविधा केंद्र आणि एन.पी.पी.ओ. यांच्या अधिकाऱ्यांच्या तपासणीअंती व मान्यतेनंतर डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करण्यात आली. कृषी पणन मंडळ, अपेडा व एन.पी.पी.ओ. यांच्या संयुक्त प्रयत्नाने डाळिंबाच्या ३२४ बॉक्सेसमधील १ हजार २९६ किलो डाळिंबांवर विकिरण प्रक्रिया करुन हा माल विमानमार्गे ऑस्ट्रेलियातील मेलबॉर्न येथे रवाना करण्यात आला.

ही डाळिंबे ऑस्ट्रेलिया येथे होणाऱ्या फाईन फुड ऑस्ट्रेलिया या प्रदर्शनामध्ये अपेडामार्फत प्रदर्शित केली जाणार आहेत. त्याद्वारे तेथील स्थानिक ग्राहकांना आकर्षित करुन भारतीय डाळिंबासाठी ऑस्ट्रेलियन बाजारपेठ काबीज करण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहेत. भारतीय डाळिंबांनी ही बाजारपेठ काबीज केल्यानंतर डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होणार असल्याचे के.बी. एक्सपोर्टचे संचालक कौशल खट्टर यांनी सांगितले.

राज्यातील डाळिंब हे ऑस्ट्रेलियासाठी पाठविणे हा डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांसाठी एक अभिमानास्पद क्षण आहे. यामुळे इतर निर्यातदारदेखील कृषि पणन मंडळाच्या विकिरण सुविधा केंद्रावरुन ऑस्ट्रेलिया येथे डाळिंब निर्यातीसाठी पुढाकार घेतील, अशी अपेक्षा कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक श्री. कदम व श्री. कोकरे यांनी व्यक्त केली आहे.

अरणगाव येथील वर्का चॅरिटेबल ट्रस्टच्या वर्का स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेज आणि फिनिक्स स्कूलमध्ये स्थापन करण्यात आलेल्या सखी – सावित्री समितीतील सदस्य.

वर्का स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेजमध्ये सखी – सावित्री समिती स्थापन

नगर – शासन निर्णयानुसार मुलींच्या सुरक्षिततेसाठी अरणगाव येथील वर्का चॅरिटेबल ट्रस्टच्या वर्का स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेज आणि फिनिक्स स्कूल मध्ये सखी – सावित्री समिती गठीत करण्यात आली.

मुलींच्या अडचणी समजून घेण्यासाठी यावेळी एक तक्रार पेटी देखील बसविण्यात आली आहे. जी महिन्याच्या शेवटी समितीतील सर्व सदस्यांच्या उपस्थितीत उघडण्यात येणार आहे. तसेच त्या तक्रारींची दखल घेऊन त्यावर योग्य ती कार्यवाही देखील करण्यात येणार आहे. शाळेमार्फत शिक्षकेतर कर्मचारी, शालेय विद्यार्थ्यांची ने–आण करणारे बसेसवरील वाहन चालक व त्यांचे सहाय्यक यांचे चारित्र्य प्रमाणपत्र मिळण्याकरिता पोलिस स्टेशनलाही अर्ज दाखल करण्यात आला आहे. शाळेमध्ये सर्व वर्गात तसेच महत्वाच्या सर्व ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरेही बसविलेले आहेत.

या समितीत वैद्यकीय तज्ञ डॉ.सोनाली गहिले, ग्रामपंचायत सदस्य नंदा कराडे, अंगणवाडी सेविका कल्पना दिक्षित, वर्का स्कूल व फिनिक्स स्कूलचे प्रत्येकी दोन–दोन पालक प्रतिनिधी, दोन–दोन विद्यार्थी विद्यार्थीनी प्रतिनिधी, दोन–दोन शिक्षक प्रतिनिधी, बस वाहतूक प्रतिनिधी, संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती रुक्मिया, वर्का स्कूलचे प्राचार्य डॉ. रामीन, फिनिक्स स्कूलच्या प्राचार्या मिताली बाजपेयी, उपप्राचार्य डॉ. लोंढे, सुपरवाइजर मुलानी मुशर्रफ हे सर्व सदस्य म्हणून काम पहाणार आहेत. या सर्वांच्या उपस्थितीत आजची बैठक पार पडली.

झोपलेल्या प्रशासनाला जागे करण्यासाठी आक्रमक भूमिका घ्यावी लागणार

जयराम जाधव यांचे आश्वासन

नगर – एसएसपीएसएसपी ऑफिस झोपेचे सोंग घेत असल्याने या विभागातील प्रश्न गंभीर बनत चालले आहे. त्यांना जागे करण्यासाठी आक्रमक भूमिका घ्यावी लागणार आहे. गेंडाघाची कातडी परिधान करुन ते गरिब असल्याचा आव आणत आहे. मात्र संघटनेच्या माध्यमातून हे ज्वलंत प्रश्न सोडविण्यात येणार असल्याचे आश्वासन जयराम जाधव यांनी दिले. तर तर संघटना एससी एसटी ओबीसी पुरती मर्यादीत नसून, सर्व कर्मचाऱ्यांच्या हितासाठी संघर्ष सुरु असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

एस.सी., एस.टी. ओबीसी वेल्फेअर असोसिएशन नगरच्यावतीने नगर डिव्हिजन कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना सर्कल सेक्रेटरी जयराम जाधव.

एससी एसटी ओबीसी वेल्फेअर असोसिएशनचा डिव्हिजन कार्यकर्ता संवाद मेळावा उत्साहात

एसीसी एसटी ओबीसी वेल्फेअर असोसिएशन अहमदनगरचा डिव्हिजन कार्यकर्ता संवाद मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्यात आलेल्या पोस्ट कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य व गोवा राज्याचे सर्कल सेक्रेटरी जयराम जाधव यांच्या अध्यक्षतेखाली या मेळाव्यासाठी रिजनल सेक्रेटरी अमोल साळवे, प्रकाश कदम, पिराजी सदावर्ते, शिलवंत, प्रविण शिंदे, किरण शिंदे, दिपक नागपूरे, अमोल साबळे, प्रदिप सुर्यवंशी, महेश सदाफुले, महेश तामटे, विधाते, विजय चाबुकस्वार, शैलेश राहिलेद आदींसह जिल्ह्यातील सभासद उपस्थित होते.

श्रीगोंदा येथील पडण्यास आलेले इमारत, महिलांसाठी स्वच्छतागृहाच्या प्रश्नावर याप्रसंगी चर्चा करण्यात आली. सभासदांच्या मुलांना मिळणारी शैक्षणिक फी शाळा सुरु होण्याच्या प्रारंभी मिळावी व मेडिकल बिल लवकरात लवकर मिळण्याच्या समस्या मांडण्यात आल्या. प्रास्ताविक सतीश येवले यांनी केले. आभार असोसिएशनचे सेक्रेटरी विजय चाबुकस्वार यांनी मानले.

अहमदनगरमधील शिक्षक वैभव वाघ यांना सातारा हिल हाफ मॅरेथॉनमध्ये गोल्ड मेडल

नगर – गिनीज वर्ल्ड बुकमध्ये नोंद असलेल्या 'सातारा हिल हाफ मॅरेथॉन' स्पर्धा १ सप्टेंबर रोजी सातारा येथे झाली. स्पर्धेत नगरच्या अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेतील उपशिक्षक वैभव वाघ यांनी २१ कि.मी. अंतर १ तास ४८ मिनिटे २७ सेकंदात पूर्ण करुन गोल्ड मेडल व हिल चॅम्पियन पुरस्कार प्राप्त केला आहे. स्पर्धेत देशभरातील सुमारे ८ हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेचे उद्घाटन खा. श्रीमंत उदयनराजे भोसले यांच्या हस्ते झाले.

जय बालाजी ग्रुप आयोजित १३ वी 'सातारा हिल हाफ मॅरेथॉन' शहरातून सुरु होऊन हिरवाईने नटलेल्या डोंगररांगा असलेल्या येवतेश्वर घाटातून कास पठार रस्त्याने झाली.

अतिशय खडतर अशा या मॅरेथॉनमध्ये धावपट्टेची कसोटी लागते. वैभव वाघ यांनी दोन तासाच्या आत मॅरेथॉन पूर्ण करण्याची कामगिरी केली आहे.

या यशाबद्दल संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी, विश्वस्त मंडळाचे सर्व सदस्य, मुख्याध्यापिका ज्योती सिसोदिया, प्रशालेचे सर्व शिक्षक, पालक यांनी वैभव वाघ यांचे कौतुक करुन अभिनंदन केले आहे.



हमदनगर पोस्टल सोसायटीचा १०४ वा वर्धापन दिन प्रसंगी आयोजित कार्यक्रमप्रसंगी वरिष्ठ डाक अधीक्षक बी. नंदा. समवेत अमोल भूषकर व संदीप हदगल आदी.

अहमदनगर पोस्टल सोसायटीचे कार्य उल्लेखनीय

वरिष्ठ डाक अधीक्षक बी नंदा यांचे प्रतिपादन

नगर – अहमदनगर पोस्टल सोसायटीचे कार्य उल्लेखनीय असल्याचे प्रतिपादन अहमदनगर विभागाचे वरिष्ठ डाक अधीक्षक बी नंदा यांनी केले. अहमदनगर पोस्टल सोसायटीचा १०४ वा वर्धापन दिन प्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होती. यावेळी इंडियन पोस्ट पेमेंट बँकेचे विभागीय व्यवस्थापक अमोल भूषकर व डाक अधीक्षक संदीप हदगल उपस्थित होते.

यावेळी बोलताना बी नंदा म्हणाले की अहमदनगर पोस्टल डिव्हिजन को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड अहमदनगर या महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेल्या संस्थेच्या स्थापनेस ३० ऑगस्ट रोजी १०४ वर्ष पूर्ण झाली असून संस्थेने १०५ व्या वर्षात पदार्पण केले आहे संस्थेची शतकोपार परंपरा नवी पिढी सक्षमपणे सांभाळत आहे सोसायटीचे कार्य उल्लेखनीय असून यापुढेही सोसायटीचा नावलौकिक वाढविण्याचा प्रयत्न या संचालक मंडळांनी करावा अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली

सोसायटीमार्फत मार्फत सभासदांच्या वारसास मदत गुणवंत पाल्यांच्या गुणगौरव सेवानिवृत्तांचा गुणगौरव याच बरोबर सभासदांना अल्प व्याजदराने २५ लाखापर्यंत शिक्षणासाठी व पाल्यांच्या करिता तसेच घर बांधणी घर खरेदी याकरिता कर्ज देते. कर्जाची वसुली पगारातून नियमित होत असल्याने संस्थेची वाटचाल प्रगतीच्या दिशेने चालली असल्याची माहिती चेअरमन रामेश्वर ढाकणे यांनी दिली.

संस्थेची संचालक प्रमोद कदम यांनी सूत्रसंचालन केले तर प्रफुल कुमार काळे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी संस्थेचे संचालक सुनील कुलकर्णी, निसार शेख, महेश तामटे, किशोर नेमाने, सलीम शेख, शिवाजी कांबळे, स्वप्न चिल्वर, अर्चना दहिंडे, बळी जायभाय, व्यवस्थापक नितीन वाघ, सभासद सुनील भामवत, सतीश येवले, दीपक जसवानी, गणेश केसकर, अंबादास सुद्रिक, शरद नवसुपे, अरविंद वालझाडे, विजय चाबुकस्वार, संदीप मिसाळ, सुखदेव पालवे, जय मडावी, कवीश्वर ताकपेरे, अविनाश आढाव, सुनील जाधव, देवेंद्र शिंदे, अश्विनी फुलकर, संचिता गाडे आदींसह सभासद हजर होते

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

आय.एम.एस येथे शिक्षक दिन उत्साहात

नगर – नॅशनल एज्युकेशन पॉलिसी (एन.ई.पी.) २०२० व्यक्तींना अध्यापनातील करिअरला प्रोत्साहन देते आणि त्याचे उद्दिष्ट ठरवते. गुणवत्तायुक्त शिक्षण म्हणजे औपचारिक, अनौपचारिक, आणि कॅम्पस आधारित शैक्षणिक क्रियाकलापांद्वारे राष्ट्राच्या भविष्य घडवणारी शिक्षकांची महत्त्वपूर्ण भूमिका मानली जाते.भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा ५ सप्टेंबर हा जन्मदिन 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. 'शिक्षक' हा भावी पिढीचा शिल्पकार मानला जातो, जो आपल्याला ज्ञान आणि जगाची सकारात्मक दृष्टी प्रदान करतो. हा दिवस आपल्या गुरु, शिक्षक आणि सर्व ज्येष्ठांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी म्हणून साजरा करतो.



आय.एम.एस येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

आय.एम.एस बौद्धिक अन्वेषणाची संस्कृतीस प्रोत्साहन देते. शिक्षक दिनाच्या निमित्ताने आय.एम.एस ग्रंथालयात संचालक डॉ. एम. बी. मेहता आणि उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबास यांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या छायाचित्रावर पुष्पहार अर्पण करुन हा उत्सव साजरा केला गेला. हा उत्सव सकाळी ११ वाजल्यापासून संध्याकाळी उशिरापर्यंत चालला.

प्रत्येक वर्षी वाचनालयाकडून अभ्यासाचे साहित्य वितरित केले जाते. शिक्षक दिनाच्या निमित्ताने, मॅनेजमेंट एज्युकेशन कोर्सेसशी संबंधित (एम.सी.ए. आणि एम.बी.ए.) अभ्यासाचे साहित्य (स्टडी मटेरियल) मोफत विद्यार्थ्यांना दिले जाईल याची घोषणा झाली. पुढील महिन्याच्या शेवटपर्यंत ही वितरण प्रक्रिया सुरू राहील. ही क्रिया विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाढीसाठी आणि यशासाठी उपयुक्त आहे; अशी आयएमएसची धारणा आहे. एम.बी.ए.–२ वर्गातील विद्यार्थ्यांनी जस्मिन शेख हिने सूत्रसंचालन केले आणि शिक्षकांच्या योगदानाचे कौतुक केले. श्री. साहिल आणि श्री. अयाझ या विद्यार्थ्यांच्या मदतीने शिक्षकांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

या शिक्षक दिनाच्या सोहळ्यावर एम. बी. मेहता यांनी शुभेच्छा दिल्या आणि डॉ. राधाकृष्णन यांचे मार्गदर्शन प्रेरणादायक ठरावे, असे सांगितले. डॉ. मेहता म्हणाले की शिक्षकाची जबाबदारी जीवनभर असते आणि नवीन विद्यानुसार आपल्या शैलीत बदल करणे आवश्यक आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि सल्ला देता येईल व देत राहू.

यावेळी डॉ. यू.एच. नगरकर (आयटी विभाग प्रमुख), डॉ. प्रणोती तेलोरे (प्रमुख, व्यवस्थापन विभाग), सौ. शरयू कुलकर्णी (कार्यालय अधीक्षिका), नरेंद्र कदम (लेखापाल), तसेच दोन्ही विभागांमधील शिक्षक आणि अकाउंट्स विभागातील व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते. ग्रंथालय कर्मचारी सिराज मुलाणी, कु. कृष्णा थोरे, सौ. रश्मिया शख, आणि ग्रंथपाल डॉ. स्वाती बार्नबस यांची उपस्थिती उल्लेखनीय होती.

रामगिरी महाराज, नितेश राणेंचे फोटो स्टेट्सला ठेवल्याने युवकावर खुनी हल्ला

नगर – सरला बेटचे महंत रामगिरी महाराज व भाजपा आ. नितेश राणे यांच्या २ सप्टेंबर रोजीच्या भेटीचे फोटो स्टेट्सला ठेवल्याने त्याचा राग येवून चौघांनी महाविद्यालयाच्या गेटवर युवकावर चॉपर, फायटरने हल्ला करत कंबरेच्या बेल्टने गळा आवळून त्याचा खुन करण्याचा प्रयत्न केल्याची घटना श्रीरामपूर येथील आर बी एन बी कॉलेजच्या गेटवर बुधवारी (दि.४) सकाळी १०.१५ च्या सुमारास घडली.

याबाबत प्रदीप भागीनाथ विठेकर (वय १७, रा. वांजरगाव, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजी नगर) याने श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी रिजवान शेख व त्याच्या ३ अनोळखी साथीदारांच्या विरुद्ध जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी विठेकर हा श्रीरामपूर येथील आर बी एन बी कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहे. त्याने त्याच्या सोशल मिडीयाच्या स्टेट्सला सरला बेटचे महंत रामगिरी महाराज व माजपा आ. नितेश राणे यांच्या दि. २ सप्टेंबर रोजीच्या भेटीचे फोटो ठेवले होते.

याचा राग येवून रिजवान शेख व त्याच्या ३ अनोळखी साथीदारांनी प्रदीप याला बुधवारी (दि.४) सकाळी १०.१५ च्या सुमारास कॉलेजच्या गेटवर अडवून त्याला कंबरेच्या बेल्टने तसेच चॉपर, फायटरने मारहाण करुन जखमी केले. तसेच बेल्टने त्याचा गळा आवळून त्याला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला असल्याचे फिर्यादित म्हंटले आहे. या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक समाधान सोळंके हे करीत आहेत.

पाहिजेत
आया/मावशी जागा : ३
समक्ष भेटा : सांगळे हॉस्पिटल वैभव हॉटेलसमोर, बुरुडगाव रोड,अ.नगर
7020553523,9272735458

पाहिजेत
कॉम्प्युटर टायपिस्ट (मराठी) जागा - ८
चैतन्य बहुउद्देशीय ग्रामीण विकास संस्था
जय टॉवर पाचवा मजला, बंगाल चौकी, गुलमोहर पार्क टाकीज जेजारी, अ.नगर
8888516767

महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्या भिंगार
नगर-पाथर्डी रोड भिंगार अहमदनगर ४१४००२. फोन : ०२४१ - २४४३८७

पाहिजेत
सहा.व्यवस्थापक जागा - १
पात्रता- बी.कॉम, एम.कॉम, जी. डी. सी & ए व संगणकीय ज्ञान आवश्यक
क्लार्क जागा- २
पात्रता- बी.कॉम, एम.कॉम, जी. डी. सी & ए व संगणकीय ज्ञान आवश्यक
वसुली अधिकारी जागा - १
पात्रता - अनुभवी व्यक्तीना प्राधान्य. सहकार खात्यातील व सहकारी बँकेतील निवृत्त अधिकारी असल्यास प्राधान्य.
टीप- पुरुष उमेदवारांना प्राधान्य.
दि.२०/ ९/२०२४ पर्यंत समक्ष अथवा पोष्टाने अर्ज संस्थेच्या पत्यावर पाठवावेत.
श्री. केरू बबनराव गोंधळे, व्हा.चेअरमन — श्री. प्रसन्न मधुकर झोडगे, चेअरमन

त्वरित पाहिजेत
Assistant Accountant (सहाय्यक लेखनीस) 2 जागा पुरुष १ महिला १
पात्रता - टॅलीची संपूर्ण माहिती, तसेच Microsoft office, Microsoft Excel कामाचा ३ ते ४ वर्षाचा अनुभव आवश्यक आहे. विवाहित महिलांना प्राधान्य दिले जाईल.
इच्छुक उमेदवारांनी समक्ष मुलाखतीसाठी ९ सप्टेंबर २०२४ रोजी खालील पत्यावर समक्ष उपस्थित रहावे.
व्ही के ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज
श्री. अतुल वैकर : मो. ७३८५०८५४१,
मयूर बांगला, श्रीनाथ कॉम्प्लेक्स फेज -२च्या पाठीमागे, अंबिका महिला बँकेच्या शेजारी, पाईपलाईन रोड, अहमदनगर,
वेबसाईट -vkelectricgrup.com

सायेडी परिसरातील प्रशस्त सचवटालनाकरीता पाहिजेत
सेल्समन
महिला अथवा पुरूष, अनुभवीना प्राधान्य.
समक्ष भेटा
संपदा
सारीज् अॅण्ड ड्रेस मटेरियल
भिस्तवाग चौक, सायेडी, अ.नगर.

कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे
मुली : ४
वेळ : ९ ते ३.३०
माहिती व्हॉटसअॅप करणे
9370505859

पाहिजेत
सेल्समन : २
हेल्पर : २
होलसेल कापड दुकानात मेहनती व होतकरू मुले पाहिजेत.
8830077293

पाहिजे
दुकानात काम करण्यासाठी अकॉंटंट पाहिजे
त्वरित संपर्क करा
9975454505
महात्मा फुले चौक, मार्केटयार्ड गाळा भाडयाने ७०० ते ५०० स्क्वे फुट पाहिजे
त्वरीत संपर्क करा
9096111399

विकणे
तपोवन रोड वरील 1RK चे दोन फ्लॅट त्वरीत विकणे
9604266354
9552778841

भाड्याने देणे
सारडा कॉलेज व सिव्हिल हॉस्पिटल जवळील पत्रकार चौकातील दु बीएचके फ्लॅट त्वरीत भाड्याने देणे आहे.
9881141240

धनश्री उद्योग
सरकारमान्य संस्था
घरातून काम करा व रोज कमवा 500 ते 1000 रु.
बाराही महीने विविध पॅकिंगचे व्यवसाय करा.
माल फ्री घरपोहोच
अवर प्लाझा ग्रेसमॅट, नवी मेडिकलच्या खाली, माळीवाडा एस.टी. स्टॅण्ड समोर, अ.नगर.
7066575497

CHANGE IN NAME
MY NAME IS GAURAV RAJENDRA THOMBE BUT MY PREVIOUS NAME WAS GAURAV RAJU THOMBE BUT MY ACTUAL NAME IS GAURAV RAJENDRA THOMBE
Aadhar No :
6231 2309 2529

शाडू मातीचे गणपती
पेण येथील शुद्ध शाडू मातीचे सजावट केलेले, शास्त्रोक्त सात्विक, मनमोहक, देखण्या श्रीमंत गणेशमूर्ती किफायतशीर दरात मिळण्याचे कलादालन
डेकोरेट केलेल्या मूर्ती पाहण्यासाठी अवश्य भेट द्या.
विचे आर्ट गॅलरी बुकिंग चालू आहे
श्री लक्ष्मीनारायण मंदिरा समोर, बागडपट्टी, अ.नगर
मो. 9860222259, 9665022280

बंगला विकणे आहे
मिस्कीनमळा रोडलगत तारकपुर सीव्हिल हाडको मधील १००स्के. फुट प्लॉटवर असलेला स्वतत्र बंगला त्वरीत विकणे आहे
9370888682 (एकदंत क्षणव)

जागा भाड्याने देणे आहे
औरंगाबाद रोड, आकाश हॉटेलशेजारी, १० गुंठे जागा, रोडटच फरशी दुकानासाठी भाड्याने देणे आहे.
7588543754

पाईपलाईन रोड टच ९८०० स्के. फूट
दुकान / शॉप, बँक, ऑफिस, पतसंस्था, हॉस्पिटल, सुपर शॉपी साठी भाड्याने देणे आहे.
9923228111

1 BHK फ्लॅट भाड्याने देणे
नगर-कल्याण रोड श्रीकृष्णनगर २४ तास पाणी व लिफ्टची सोय
8459559115
9921199186

मथुरा लॅण्ड सराफ बाजार, गंजबाजार जागा भाड्याने देणे आहे
ग्राऊंड फ्लोअर ८०० स्क्वे.फूट
बेसमेंट ८०० स्क्वे.फूट
संपर्क : 9890906853

गणरायाच्या आगमनासोबत आरोग्य आणूया शुद्धायू सोबत!
शुद्धायू लाकडी घाणा तेल
शुद्ध तेल, शुद्ध जीवन!

प्रत्यक्ष तेल निर्मितीचा अनुभव घ्या...
युनिट ०१ - केवन अप्लायंट्स, सहकार नगर रोड, सावेडी, अ.नगर
युनिट ०२ - नेत्रा सुभाष चौक, चितळे रोड, अ. नगर
९२ ५७५७ ७९७९ : घरपोच सुविधा उपलब्ध

रेडी पझेशन!
यशोदा रो-हॉसेस
२ बीएचके लक्ष्मुरीअस रो-हॉसेस

बुकिंग सुरू!
वरद ट्विन्स
२ बीएचके लक्ष्मुरीअस रो-हॉसेस
साईट : गव्हाणे मळा
वडगाव गुप्ता रोड, अहिल्यादेवीनगर

बुकिंग सुरू
शिव शंकर
२ बीएचके लक्ष्मुरीअस रो-हॉसेस

साईट : कल्पतरू, श्री शंकर महाराज मठासमोर नालेगांव : कल्याण रोड, अहिल्यादेवी नगर

स्पेशल अमेनिटीज - किचन ट्रॉली • सेफ्टी डोअर
सोलर २०० लि. • मेन डोअर फर्निचरमध्ये सिलजाम सह

824 SQFT शॉप विकणे आहे - तपोवन रोड, नाना चौक
- प्रोजेक्ट बाय -
साई अथर्व कन्स्ट्रक्शन्स
ऑफिस - शॉप नं.१, राधा रेसिडेन्सी, वाणीनगर पाईपलाईन रोड, अ.नगर
: बुकींगसाठी संपर्क :
राजेंद्र तागड - 9890100173
इंजि. अश्विन तागड - 9096831111

चोवीहार (ब्याळू) हाउस
पावन पर्युषण पर्व निमित्त
चोवीहार की व्यवस्था की गई है
रविवार दि.०१/०९/२०२४ से
शनिवार दि.०७/०९/२०२४ तक
समय : शाम ५ बजे से ६.३० बजे
स्थानक : महेश मंगल कार्यालय,
बन्नी महाराज निवाई के पास, रामचंद्र खुंट, अहमदनगर
आनंद गुरु परिवार

जा.क्र. २४२२ — दि. ०९/०९/२४ — दि. २८/०८/२०२४
:: विना सहकार नहीं उध्दार ::
महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, भिंगार
३४५, एम.जी.रोड, भिंगार, अहमदनगर - ४१४००२ फोन नं. (०२४१) २४४१२५७, २४१५२२०
आडते बाजार शाखा २४१८५२१ Email-mnsphhingar@gmail.com

वार्षिक सर्वसाधारण सभा सुचना पत्र
(फक्त सभासदांसाठी)
महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, ब्राम्हण गल्ली, भिंगार, अ.नगर या संस्थेच्या सर्व सभासदांनं कळविण्यात येते की संस्थेची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २८/०९/२०२४ रोजी सायं. ६.०० वाजता ब्राम्हणगल्ली कॉम्प्स, पपिंग स्टेशन रोड, भिंगार, अ.नगर या ठिकाणी संस्थेचे चेअरमन श्री. डॉ. अशोक शांतीलाल गंगेडे यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयाचा विचार करून निर्णय घेणेसाठी आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर दिलेल्या ठिकानावर सहभागी व्हावे, ही विनंती.
- अगेंडा विषय-
१) या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित राहणे बाबत आलेल्या अर्जाना मान्यता देणे.
२) दि. ३०/०९/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
३) सन २०२३ - २०२४ या वर्षाची हिशेबाची पत्रके स्विकृत करणे.
४) मा. संचालक मंडळाने संमत केलेल्या सन २०२३-२०२४ च्या नफा वाटणी व लाभांश यांस मान्यता देणे.
५) सन २०२३-२०२४ या वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल व त्यावर कार्यालयाने केलेल्या दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेणे.
६) सन २०२४-२०२५ या वर्षाकरिता मा. संचालक मंडळाने नेमणूक केलेल्या वैधानिक लेखापरिक्षकास मान्यता देणे.
७) सन २०२४- २०२५ या वर्षाच्या मा. संचालक मंडळाने मान्यता दिलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
८) मा. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची कायदा कलम ७५(२)(१) नुसार माहिती घेणे.
९) सन २०२३ - २०२४ मध्ये एकरकमी कर्ज परतफेड योजने द्वारे पुर्ण झालेल्या कर्ज खात्यांची माहिती घेणे व मान्यता देणे.
१०) पुर्वीचे वसुल न होणारे थकीत कर्ज Write off करणे बाबत (कर्ज माफ)
११) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

दिनांक : २८/०८/२०२४
स्थळ : भिंगार, अहमदनगर
मा. संचालक मंडळाच्या आज्ञेनुसार
श्री. राजेंद्र ला. गेहेर
प्रभारी व्यवस्थापक

विशेष सुचना :
१. सभा वर दिलेल्या वेळेवरच सुरू होईल, गणपुर्ती अभावी सभा तहकुब झाल्यास सदरची सभा त्याच दिवशी, त्याच ठिकानी सायं. ०६:३० वा. घेण्यात येईल. सदर सभेस गणपुर्तीची अवश्यकता असणार नाही.
२. वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषयासंबंधी काही प्रश्न अगर सुचना असल्यास त्या दिनांक २१/०९/२०२४ पर्यंत संस्थेच्या मुख्य कार्यालयास लेखी आणून द्याव्यात.
३. सन २०२३-२०२४ ये ताळेबंदपत्रक, नफातोटापत्रक व अंदाजपत्रक संस्थेच्या नोटीस बोर्डवर ठकवलेले आहे.
४. ज्या सभासदांनी आपले मोबाईल नंबर संस्थेत नोंदविलेले नसतील त्यांनी लवकरात लवकर संस्थेत येउन नोंदवावेत.
५. ज्या सभासदांचे पत्ते बदलले असतील त्यांनी आपले नविन पत्ते केवायसी पुर्ण करून संस्थेत येवुन बदल करून घ्यावे.
६. ज्या सभासदांनी आपले भाग दाखले येउन गेले नाही त्यांनी संस्थेच्या कार्यालयीन वेळेत येउन येउन जाणे..
७. ज्यांना अहाल मिळाले नसतील त्यांनी संस्थेच्या कार्यालयीन वेळेत येउन येउन जाणे.
८. सभासदांच्या पाल्यासाठी मागील वर्षी इ. ९० वीमध्ये ८५ % च्या वर इ. १२ वी मध्ये ८०% च्या वार मार्क मिळालेल्या पाल्याचा सत्कार करण्याचा सदर सभेत योजिले आहे. त्याप्रमेणे आपले लेखी अर्ज दि. २१/९/२०२४ पर्यंत संस्थेच्या मुख्य कार्यालयात सादर. ४ वाजेपर्यंत लेखी अर्ज व गार्डरिट जमा करणेत. नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
९. सभासद सहकारी शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय वार्षिक सभेच्या वेळेपूर्वी अर्धातास आगोदर येण्यात येईल, तरी सभासदांनी या कार्यक्रमास उपस्थित रहाते ही विनंती.



वाढलेल्या **वजनाने त्रस्त आहात? वजन कमी करणे झाले सहज शक्य**
7020025541

टिप : मुली-सो च्या वेळा बदलु शकतात — दिनांक : 30 ऑग. ते 06 सप्टे. 2024

अहो विक्रमार्का	हिंदी	07:15 P.M.
खेल खेल में	हिंदी	04:30 P.M. 10:00 P.M.
नेता गीता	मराठी	01:45 P.M.
स्त्री - २	हिंदी	8:00, 10:00 11:00 A.M., 1:00 1:55,PM 3:50, 4:45, 6:50, 7:40, 9:45, 10:00 PM
हि डार्ली ऑफ वेस्ट केनॉल	हिंदी	11.00 PM

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow **CONNPLEX** CINEMA TICKETS AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

DR.VITHALRAO VIKHE PATIL FOUNDATION'S INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT & RURAL DEVELOPMENT (IBMRD)
Recognized by AICTE, New Delhi & Govt. of Maharashtra, Affiliated to the Savitribai Phule Pune University
Vadgaon Gupta (Vilad Ghat), Po. M.I.D.C., Ahmednagar-414111, (M.S.)
Email: directoribmrd@gmail.com / admissions.ibmrd@gmail.com

ADMISSION NOTICE (NON CAP)
FIRST & DIRECT SECOND YEAR ADMISSION FOR A.Y. 2024-25

Sr. No	Program	Choice Code	First Year Intake	Direct 2nd Year Intake	First Year	Direct 2nd Year
1)	MBA	511210110	120	25	Vacant Seat After CAP Round	Vacant Seat
2)	MCA	511224110	60	0		

Applications are invited for admission to First year MBA / MCA against probable vacant seats remaining after CAP rounds, Institute Level Seats & Lateral Entry (Direct Second year) from the eligible candidates for the year 2024-25.
For against Vacant seats candidate should apply between 07th to 10th September and for Lateral Entry between 01st to 05th September 2024.
For filling application form please contact to our Admission cell
Contact:-
MBA-8149214110, 9762573384, 9822999028
MCA-9422342036, 7588092515, 9890671716

:: कुलस्वामीनी प्रसन्न ::
शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
नगर-पुणे-नगर
आता आपल्या शहरातून

दररोज
- नगर येवून सं. ७,८,९ व दुपारी २.००
- पुणे येवून स.११,१२,२ व सायं.५ वा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
मिळवाव पॉईंट - पिंपराळा पीठ, ओपजी कॅन्टीन, लाखुडा हॉटेल, राज पेंडिस बॉक्स,कार्यालय बॉक्स,केशवा
पुणे ड्रॉप - वाघोली, फरसी वायवान,पेरवडा, नवीन विश्वाजीनगर बसस्टॉप. बुकिंग आवश्यक
अमर-प्रेम हॉलिडेज
ऑफिस - चितळेरोड, अ.नगर
9657746555/ 9226399555

:: श्री कुलस्वामीनी प्रसन्न ::
गोविंदा ! गोविंदा !! गोविंदा !!!
श्री तिरुपती बालाजी
दर्शनसह श्री पद्मावती, गोविंदराज दर्शनसह कोल्हापुर महालक्ष्मी
सहल दि. ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १० नोव्हेंबर २०२४ बुकिंग दि. १५ पुर्वी पहाट सुरु (स्पर्शीट सिट्स)
☆ दर्शनीय स्थळे ☆
श्री तिरुपती बालाजी व पद्मावती व आंध्रप्रदेश व महाराष्ट्र राज्यातील दर्शनीय व प्रेक्षणीय स्थळ
☆ गोविंदराज स्वामी देवस्थान व महालक्ष्मी अंबाबाई देवस्थान
☆ श्री गोविंदराज स्वामी देवस्थान व कोल्हापुर महालक्ष्मी
☆ प्रतिव्यक्ती ☆
₹ 6501/-
☆ ग्रमाशिष्ट मोफती ☆
इंडिका विस्टा (२, ३, ४ बेडरूम) एसी, बाथ, नाश्ता, जेवण सर्व सोयी आहेत ३ ते ५ व्यक्ती मिळुन सुट्टीचा व धार्मिक लेखा, विमान भाडाचे वेगळे मिळेलच, दुसरे काम
☆ ऑफिस ☆
जगन्नाथ पेठ, नगर रोड, नगर-पुणे, नगर-मनमाड, नगर-कल्याण
Amar Prem Holidays & Multiple services
जगन्नाथ : मो. 9226399555/ 9657746555
पुणे : मो. 9168655159/ 9819027917
नाशिक : मो. 9822201125/ 8149224403
जालना : मो. 9860150999
नाशिक : मो. 7030004041 / 9423471413

१० वे पुण्यस्मरण
मनी होता भोळेपणा, पण कधी न दाखवला
गोडेपणा अजुनही होतो तुमचा भास,
तुम्ही आहात आमच्या जवळपास
सौ.दिपाली संजीवकुमार कासवा
(चिंचवडगावावाला)
जन्म १२/९/१९७८ । स्व.दि.५/९/२०१४
आपणांस **भावपुर्ण श्रद्धांजली**
☆दुःखांकित☆
रमेशतात्रजी सुभाषतात्रजी गुगळे । सौ. अरुणा रमेशतात्रजी गुगळे
(दिपाली एजन्सीज मो. ९२२६७०१००८-बुरुड गल्ली, अ.नगर)
सौ. ज्योती सचिन भंडारी । सौ. तृप्ती आनंद गांधी । सौ. भक्ती आशिष मुनोत
सौ. वैशाली पुनम मुनोत । हेमंत गुगळे । दिनेश गुगळे । संतोष गुगळे । सार्थक भंडारी
चि. यश । शुभम । संजीवकुमार कासवा / समस्त गुगळे व कासवा परिवार.

डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
☆ सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
☆ सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
☆ डोकेदुखी, मायग्रेन ☆ फिटचे आजार, अपस्मार
☆ हातपायात मुंग्या येणे, नसांवरील सूज
☆ तोल जाणे ☆ व्हर्टिगो, चक्कर येणे ☆ अर्धांगवायू, पॅरेलीसीस ☆ विसराळूपणा ☆ थरथर सुटणे, पार्किन्सन
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी नवनवमील अत्याधुनिक सुप्तिमिट्र मिशेन- कोहेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कान्चिक सोसायटीजेवारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिवीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
एशियन नोबल हॉस्पिटल मेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत